आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 25 अंक 11 फेब्रुवारी 2015

ह्या अंकात

२	अपूर्णाकाचा गुणाकार	*पु. ग. सहस्त्रबुद्धे*
२	मन केले ग्वाहीः पिठामिठाचे दिवस (भाग तीन)	*नंदा खरे*
७	'त्यांच्या' बायका, 'त्यांची' इभ्रत!	*राजेश्वरी देशपांडे*
१०	स्त्रीच्या दुःखाचा शोध घेणाऱ्या समाजव्यवस्थेची मीमांसा	*प्रभा गणोरकर*
१४	'हैदर' आणि 'डॉ. प्रकाश बाबा आमटे'	*सुभाष थोरात*
१६	प्रश्न शिक्षणाच्या गुणवत्तेचा!	*नीलेश नीमकर*
१८	भोंदू 'भगवान', भोळे भक्त!	*दिनेश गुणे*
२२	पुरुषः एक वाट चुकलेला मित्र	*अवधूत परळकर*
२७	सांस्कृतिक राष्ट्रवादाची दुधारी तलवार	*मिलिंद मुरुगकर*
२९	भारतातलं राजकारण पाकिस्तानच्या दिशेनं?	*निळू दामले*

संस्थापक – संपादक
दि. य. देशपांडे
(1918-2006)

कार्यकारी संपादक
प्रभाकर नानावटी

संपर्कः

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com

अपूर्णाकाचा गुणाकार

आपण एका राष्ट्राचे, समाजाचे, एका समूहाचे एक घटक या दृष्टीने स्वत:कडे पाहावे हा संस्कार आमच्या मनावर नाही. या दृष्टीने आम्ही स्वत:कडे पाहात नाही. एक स्वतंत्र, स्वयंपूर्ण व्यक्ती अशा दृष्टीने आपण स्वत:चा विचार करतो. आपली स्वत:ची उन्नती, परिणती, पूर्णता, मोक्ष ही गोष्ट सर्वस्वी समाजनिरपेक्ष आहे, अशी आमची बाल्यापासून वार्धक्यापर्यंत भावना असते व तद्नुसार आपले वर्तन असते.. आज शेकडो वर्षे आमच्या जीविताचे वळणच असे आहे; त्याची घडणच तशी झालेली आहे. आम्ही स्वकेंद्रित आहो. समाज हा आमच्या अवलोकनाचे केंद्र नाही. त्यामुळे समाज म्हणून जगण्याची विद्या आम्हांला हस्तगत करता येत नाही. स्वार्थ, लोभ, दुष्टपणा, मत्सर यांमुळे माणूस स्वकेंद्रित होतो ते निराळे; त्यामुळे समाजाची हानी होतच असते. पण आम्ही वरच्या पायरीवर गेलो, निर्लोभ झालो तरी आमची दृष्टी अशी स्वकेंद्रित असते. आणि त्यामुळे वैयक्तिक सद्गुणांची संपादणी उत्तम करूनही श्रेष्ठ समाजधर्म व ते सद्गुण यांचा समन्वय घालण्याची दृष्टी नसल्यामुळे आमच्या सद्गुणांतूनही विपरीत अनर्थ निर्माण होतात

''दुर्गुणांमुळे समाज विघटित होणे हे नेहमीचेच आहे; पण आपण सद्गुण म्हणून ज्यांची जोपासना करतो त्यांतूनच आपल्या समाजविमुख, आत्मकेंद्रित दृष्टीमुळे अशी चमत्कारिक मूल्य निर्माण होतात, की त्यांचा परिणाम विघातक व्हावा!.. कोणतेही कृत्य करताना, कोणतेही धोरण ठरविताना आपल्या अखिल समाजाचे चित्र डोळ्यांपुढे ठेवावे, अखिल समाजाच्या जीवनाचे आपण अंशभागी आहो ही जाणीव मनात ठेवावी, असा संस्कार भारतीय मनावर गेल्या सातशे-आठशे वर्षांत झालेलाच नाही.. वैयक्तिक जीवनात परमोच्च बिंदू गाठण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी असताना सांघिक जीवनात आम्ही सर्वत्र नामोहरम होतो ही दु:खद स्थिती म्हणजे आपल्या पूर्वीच्या तत्त्वज्ञानाचा परिपाक आहे.. आपण एकमेकांच्या सान्निध्यात आलो की अपूर्णाकाचा गुणाकार तयार होतो.'

पु. ग. सहस्त्रबुद्धे

मन केले ग्वाही: पिठामिठाचे दिवस (भाग तीन)

-नंदा खरे

विवेक सामाजिक समस्या खाजाउ इतिहास शिक्षण

एकोणीसशे पासष्ट-सहासष्टमध्ये अनेक भारतीय लोक एक सेक्युलर उपास करू लागले. तृणधान्यांची गरज आणि उत्पादन यांत साताठ टक्के तूट दिसत होती. पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांनी सुचवले, की सर्वांनी जर आठवड्यात एक जेवण तृणधान्यरहित केले तर तृणधान्ये आयात करावी लागणार नाहीत. हे म्हणणे बहुतांश भारतीयांना पटले, आणि 'शास्त्री सोमवारा'चे व्रत सुरू झाले. आजही अनेक जण करतात, म्हणे.

त्याकाळी, आणि अगदी १९८० पर्यंत भारतीय अन्नोत्पादनावर बराच जाहीर खल केला जात असे. टीका, त्रागा, विनोद, अनेक अंगांनी चर्चा होत असे; उदा. 'पावसाळा बरा आहे. आता अमेरिकेला धुत्कारायला हरकत नाही! मन्यादित परकी चलन, देशांतर्गत गुंतवणुकीची तीव्र गरज असल्याने निन्यात फार न होणे, अशा अनेक कारणांनी अन्नाची आयात हा अत्यंत हळवा मुद्दा होता.

आणि अन्न न पुरण्याचे खरे मोठे कारण होते लोकसंख्या, हे. अन्नोत्पादन वाढत होते, पण लोकसंख्याही जवळपास त्याच वेगाने वाढत होती. चोरशिपायांचा खेळ किंवा शस्त्रास्त्रस्पर्धेची उपमा देता येईल, असा हा अन्न आणि लोकसंख्येचा खेळ आजवर चालू आहे.

सोबत सहा 'तारखां'ना लोकसंख्या किती होती ते नोंदतो.

वर्ष	महत्त्व	लोकसंख्या (कोटी)
१९४७	स्वातंत्र्य	३४
१९६५	शास्त्री सोमवार	४८
१९७२	दुष्काळ एक	५६
१९९१	उदारीकरण सुरू	८५
२०१२	दुष्काळ दोन	१२५
२०१४	आज!	१२८

लोकसंख्येइतकाच महत्त्वाचा मुद्दा होता शेती-क्षेत्राची जाणूनबुजून केलेली हेळसांड, हा. पाश्चात्त्य भांडवलवादी व रशियन साम्यवादी असे एरवी एकमेकांच्या विरुद्ध सल्ले देणारे अर्थशास्त्री एकमुखाने सांगत, की वेगाने उद्योगीकरण होऊन पाहिजे असेल, तर शेतकरी आपल्या पेशातून बाहेर पडायला हवेत. आणि यासाठी शेती हा पेशा फारसा फायदेशीर ठरायला नको! म्हणूनच भारताचे कृषिमंत्री राहिलेले डॉ. पंजाबराव देशमुख म्हणतात, उत्पादनखर्चापेक्षा कमी किंमतीला आपले उत्पादन विकून आणि उत्पादनखर्चापेक्षा जास्त किंमतीला औद्योगिक आणि उपभोग्य वस्तूंची खरेदी करून शेतकऱ्यांनी भांडवलदार, व्यापारी, नोकरदार आणि सरकार या सर्वांना अलोट कर्ज दिले. (पूर्ण अवतरण आ.सु.१७.२/३, मे-जून २००७ च्या अंकात भेटेल).

अर्थात शेतीला हेतुपुरस्सर दाबणे सुरुवातीला (पंजाबरावांच्या काळात) अमानुष होत नव्हते. नेहरूंच्या काळातही शेती जास्त उत्पादक व्हावी यासाठी प्रयत्न होत होते. म्हणूनच १९४७- १९६५ या काळात लोकसंख्या चाळीस टक्क्यांपेक्षा जास्त वाढूनही केवळ तृणधान्यांत तूट, आणि तीही साताठ टक्केच होती.

शेतीचे उत्पादन वाढवण्याचा एक मोठा प्रयत्न १९६२-६४ मध्येच सुरू झाला. सिंचन वाढवणे, खते व कीटकनाशके पुरवणे, बियाण्याच्या बहु-उत्पादक संकरित जाती वापरात आणणे, असा हा प्रयत्न आज हरितक्रांती या नावाने ओळखला जातो. त्या काळी कृषिमंत्री असलेले सी. सुब्रह्मण्यम यांना त्या प्रयत्नासाठी भारत-रत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कारही दिला गेला.

पण त्या योजनेत एक मोठा दोष दिला. सिंचन नसलेल्या जागी बियाणे-खते-कीटकनाशके जास्त उत्पादन देत नसत! आज उच्च-उत्पादक संकरित जाती (high-yield hybrid varieties) याऐवजी उच्च प्रतिसाद देणाऱ्या संकरित जाती (high-response hybrid varieties) हा शब्दप्रयोग वापरतात. भरपूर सिंचन-खते-कीटकनाशके असली तरच त्या जाती उत्पादक होतात, अन्यथा नाही.

कमी खर्चात जास्त क्षेत्र सिंचित करणाऱ्या मोठ्या सिंचन योजना आधी कार्यान्वित झाल्या. हळूहळू नव्या सिंचन योजनांचा एकरी खर्च वाढू लागला. आज एकूण शेतीखालच्या क्षेत्रातल्या सिंचित क्षेत्राचे प्रमाण पाहिले तर भारत हा चीन व इतर अनेकानेक देशांच्या पुढे आहे. म्हणजे ज्या क्षेत्रांत हरितक्रांती करता येते, त्यांपैकी बहुतेक भागात ती आधीच झाली आहे. इतर भागात शेती कोरडवाहूच राहणार!

हरितक्रांतीचे दुष्परिणाम आज जोमाने ठसवले जातात. त्या क्रांतीने 'सिंचित शेतकरी आणि कोरडवाहू शेतकरी' यांच्यात दरी उत्पन्न केली. शेतकऱ्यांच्या प्रमुख निविष्टा (inputs); सिंचन, बियाणे, खते, कीटकनाशके; पूर्णपणे शेतकऱ्यांच्या नियंत्रणाबाहेरच्या औद्योगिक क्षेत्रात होत्या. यामुळे शेतकरी जास्तजास्त परतंत्र व बाजारशरण झाला आहे. उत्पादन जास्त झाले तर किंमती पडणे, पण उत्पादन घटल्यास मात्र प्रबळ गिर्हाईकांनी किंमती वाढू न देणे, याने शेतकरी दुहेरी पेचात सापडला आहे. तो ना बाजारपेठी न्याय्य मूल्यापर्यंत पोचू शकत आहे, ना अत्यावश्यक वस्तु-सेवा कायद्याच्या (essential goods and services act) मदतीची अपेक्षा ठेवू शकत आहे. अखेर त्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत काही दिलासा देणाऱ्या किंमती मिळतील, या आशेवर जगावे लागू लागले आहे.

पण तिकडे जाण्याआधी आपण १९७२-७३ चा दुष्काळ पहायला हवा. हरितक्रांती सुरू होऊन दशक होत होते. लोकसंख्या मात्र दशकाभरात सव्वा पटीपेक्षा जरा जास्तच वाढली होती. आणि कमी पावसाने दुष्काळ पुढ्यात उभा झाला. अन्नाचा भारतीय पुरवठा भारतीय गरजेच्या जवळपासही नव्हता. परकी चलनाचा साठाही फार नव्हता, कारण औद्योगिक क्षेत्र फारसे निऱ्यातक्षम झाले नव्हते. आणि यातच ७३ सालची पेट्रोलियम उत्पादनांमधली, तेव्हा अकल्पनीय वाटणारी, वाढ झाली. क्रूड ऑईल बॅरलमागे एका डॉलरहून साडेतीन डॉलर झाले! भारताकडे अन्नही नव्हते आणि ते घेण्यासाठी परकी चलनही नव्हते. जे परकी चलन होते, ते पेट्रोलियम उत्पादनांच्या आयातीसाठी सांभाळून ठेवावे लागत होते.

पर्याय उरला भीक मागण्याचा; अमेरिकेला त्यांच्या पब्लिक लॉ ४८० (PL-४८०) खाली अन्न मागण्याचा. हे घडत होते अत्यंत नाजुक राजकीय परिस्थितीत. १९७१ अखेरीस अमेरिका-पुरस्कृत पाकिस्तानचा मुखभंग करून भारताने बांगलादेशाच्या जन्मात सुईणीचे काम केले होते. भारतद्वेष्टे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष निक्सन आणि त्यांचे आणिकच भारतद्वेष्टे सल्लागार हेन्री किसिंजर, हे स्वतःच वॉटरगेट प्रकरणाने विद्ध होते. पण अमेरिकेने पीएल-४८० भीक घातली.

भारतीयांना सवयीचा नसलेले मायलो (milo) हे तृणधान्य खावे लागले. त्या धान्यासोबत आलेले काँग्रेस गवत हे तण सहन करावे लागले. काही धान्य अर्गट-मिश्रित होते, ते सहन करून पोटे बिघडवून घ्यावी लागली (Ergot ही बुरशी धान्यात घालून गुरांचे दूध वाढते. म्हणजे भारतीय लोक अमेरिकन 'कॅट्ल-फीड खात होते!).

तत्कालीन भारत सरकारने कृषितज्ज्ञांना फर्मावले, काहीही करा, पण पुन्हा या लाजिरवाण्या, अपमानास्पद स्थितीत आपण जाणार नाही, याची खात्री करून द्या! आज हरितक्रांतीला पाप मानणारे १९७२ सालचे छप्पन्न कोटी लोक कसे तारले गेले, ते विसरतात.

आणि पुढच्या वीसेक वर्षांत, उदारीकरणाच्या सुरुवातीला, पंच्याऐंशी कोटी लोकसंख्या होऊनही अन्नाची आयात कमी होत जाऊन भारत अन्नाचा नक्त निऱ्यातदार झाला. काही धान्ये आयात करावी लागतही, पण दुसरीकडे साखर, भाज्या व काही धान्ये जोमाने निऱ्यातही केली जात. हरितक्रांतीच्या सुरुवातीच्या वेळी लोकसंख्या ४५ कोटींजवळ होती. आज ती १२८ कोटी आहे. पण आज भारत बहुशः अन्न-स्वावलंबी आहे, आणि याचे श्रेय हरितक्रांतीला द्यायलाच हवे, भलेही त्या प्रकरणात मोठाले दोष असोत.

आत्तापर्यंत आपण एखाद्या कृषिमंत्र्याने इतिहास तपासावा तसे ढोबळ रेषांचे चित्र पाहिले. या सर्व प्रकारांत सुटे शेतकरी व सुटे ग्राहक यांचे काय झाले याकडे काहीसे दुर्लक्ष केले.

देशभरात पुरेसे अन्न पिकले म्हणजे सर्व नागरिकांना पुरेसे अन्न मिळाले, असे होत नाही. अन्नापर्यंत पोचायला काही 'पुरेसा रोजगार अन्न-ग्राहकांना मिळावा लागतो. जेव्हा सरकारने शेती-क्षेत्र फार फायदेशीर होऊ न देण्याचे धोरण आखले, तेव्हाच सरकारी अन्न-खरेदी व अन्न-वाटप यंत्रणा उभारणे आवश्यक झाले. बरे भारतात काही क्षेत्रे, काही प्रांत, आपल्या गरजेपेक्षा जास्त अन्न पिकवतात, तर इतरत्र देशांतर्गत अन्न-आयातीची गरज पडते. उदा. पंजाबात गहू-तांदूळ त्या प्रांताच्या गरजेपेक्षा जास्त पिकतो. उलट ओढिशा-झारखंडना इतर प्रांतांकडून अन्न घ्यावे लागते.

आणि ही वितरण-व्यवस्था कधीच निरिच्छ कार्यक्षमतेपर्यंत पोचू शकली नाही आहे. यात भ्रष्टाचाराचा भाग आहे तितकाच फार मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळायला कमकुवत यंत्रणा आणि माणसे नेमली जाण्याचाही आहे. फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया सुरुवातीपासून आजवर वाईट नियोजनासाठी बदनाम आहे. बरे, चांगले नियोजन आणि व्यवस्थापन होण्यासाठी मुळात चांगले, नागरिक म्हणूनची जबाबदारी ठसवणारे शिक्षण लागते. काही जागी ग्राहकसंघटना, रेशनकार्डधारकांच्या संघटना वाजवून चांगली सेवा वसूल करवून घेतात. इतरत्र मात्र सरकारी वितरण अधिकारी व ठोक-चिल्लर व्यापारी मिळून संगनमताने ग्राहकांना निकृष्ट सेवा देऊन लुबाडतात.

तिकडे शेतकरी आपण पिकवलेले अन्न सरकारने हमीभावाने घेण्यातल्या अकार्यक्षमतेने कंटाळून नगद पण कमी भाव देणाऱ्या मध्यस्थ व्यापाऱ्यांना शरण जातात. किंमती चढ्या होतात तेव्हा सरकारची भूमिका मंदावते. किंमती पडतात तेव्हा मात्र सरकारचे हमीभाव हा शेतकऱ्याचा अंतिम बचाव ठरतो.

शेतकऱ्यांची ही हतबलता दूर करण्यासाठी शेतकऱ्यांच्या संघटना उभारायचे प्रयत्नही झालेले आहेत. महेंद्रसिंग टिकैतांची भारतीय किसान यूनियन, शरद जोशींची शेतकरी संघटना, वगैरेंनी लक्षणीय काम केलेले आहे. परंतु इथेही भारतीय अडचणी शेवटी महत्त्वाच्या ठरतात.

एक म्हणजे संख्या, जिचे इतर स्पष्टीकरण नको.

दुसरे म्हणजे वैविध्य. दीडदोन एकरांचा अल्पभूधारक आणि कमाल जमीन कायदे धाब्यावर बसवणारे हजारो एकरांचे बिहारी मालक, यांच्या गरजांमध्ये साम्य नसते. अन्नधान्य पिकवणारा शेतकरी आणि कापूस-सोयाबीन-ऊस पिकवणारा कॅश क्रॉप शेतकरी, यांची दुःखे एकच नसतात. भरपूर गुंतवणूक केलेली पॉली हाऊस - हॉट हाऊस शेती आणि अर्धा वेळ शेतमजूर म्हणून काम करणारा अत्यल्प भूधारक, अशा दोघांनाही शेतकरी या वर्गात धरायचे कसे!

बीकेयू आणि शेतकरी संघटनाही अखेर मूठभर क्षेत्रातल्या, मूठभर पिके घेणाऱ्यांचेच प्रश्न धसास लावू शकले, व तेही तात्पुरतेच.

अखेर शेतकऱ्यांची सरकारबद्दलची वृत्ती काहीशी भारतीयांच्या एकत्र कुटुंबाबाबतच्या वृत्तीसारखी झाली आहे. त्या कुटुंबव्यवस्थेचे वर्णन विपदेच्या काळात किल्ला, आणि इतर वेळी तुरुंग, असे केले जाते. शेतकऱ्यांना तसेच ज्यादा उत्पादन-कमी किंमतीच्या काळात सरकारने मोठा खरेदीदार होऊन हवे असते, तर इतर वेळी बाजारपेठेचे चढे भाव हवे असतात. बरे, जर समाजात भावंडभाव असला, तो समाजाला कुटुंबासारखा करत असला, तर शेतकऱ्यांच्या या सरकारकडूनच्या अपेक्षा रास्तच मानायला हव्या.

उदारीकरणाने सरकार-शेतकरी संबंधांत मूलभूत बदल झाले नाहीत. परंतु शेती न करणाऱ्यांच्या मनांतला भावंडभाव मात्र घटला. एकेकाळी जाणूनबुजून दरिद्री ठेवलेल्या शेतकऱ्यांना सरकारने केलेली कोणतीही मदत शेतकऱ्यांचे लाड मानली जाऊ लागली.

उद्योग व सेवा क्षेत्रांतले लोक झपाट्याने श्रीमंत होत असताना आपण जेमतेम जगतो आहोत; याची खंत शेतकऱ्यांना आहेच. सर्व नागरी प्रजा पाणी, वीज, वाहतूक या सेवांचे अनुदानित दरच देते. शेतकऱ्यांना वीज व खते यांसाठी मिळणारे अनुदान मात्र लाड ठरते. माध्यमे जो भारत दाखवतात त्यांपासून सर्वांत दूर आहे तो शेतकरी. पण इतर भारत कुठे जातो आहे याचे खोटे, विकृत रूप मात्र माध्यमांनी रूढ केले. सरकारी दूरदर्शनच्या काळात (व दूरदर्शनपुरते आजही) त्या माध्यमात शेतकऱ्यांना स्थान दिले जात असे. खाजगी दूरचित्रवाहिन्या मात्र शेतकऱ्यांना माणसांत धरत नाहीत. एक मोठ्या वाहिनी-संचावर (झी) तर म्हणे दारिद्र्य दाखवणे वर्ज्य मानले जाते. आणि दूरचित्रवाणी आज मोबाईलच्या मदतीने सर्वत्र पोचते आहे. प्रादेशिक वाहिन्या जुजबी का होईना, सात-बाराच्या बातम्या व अग्रोवन कार्यक्रम करतात. प्रभावी लोकांच्या नजरेतल्या इंग्रजी वाहिन्या मात्र ग्रामीण व शेतीक्षेत्रांची अत्यंत थातुरमातुर दखल घेतात. याने समाजात प्रचंड भेगा-फटी पडत आहेत.

माध्यमांमधून दिसणारी सुबत्ता कमावायला शेतकरी नगदी पिकांकडे जास्त जात वळतो आहे. एकेकाळी जे शेतकरी गर्वाने मी मीठ-मसाले सोडून काहीही विकत घेत नाही; स्वतः पिकवतो!, असे म्हणत असत, ते आता संपले आहे. ऊस, कापूस, सोयाबीन यांच्या नगद-चमकदमकीसाठी धान्ये, डाळी, भाज्यांपासून शेतकरी दूर जात आहे.

त्यातही पश्चिम महाराष्ट्रातला ऊस शेतकरी तुलनेने सधन आणि वऱ्हाडातला कापूस-उत्पादक मात्र त्रासात, असे चित्र उदारीकरणानंतर ठसत गेले आहे. मराठवाड्यातल्या ज्वारी-कर्डई पिकवणाऱ्या शेतकऱ्यांची तर कोणीच दखल घेत नाही आहे.

शेतकरी नसलेल्यांना शेतीक्षेत्राचे प्रश्न समजावून द्यावे, त्यांवर विचार करायला सामग्री पुरवावी, या हेतूने 'आजचा सुधारक'ने एक विशेषांक काढला (अंक १७.२/३, मे-जून २००१, अतिथी संपादकः चिं.मो.पंडित). त्यानंतर अतिथी संपादकांना व 'आ.सु.'ला अनेक निरोप आले, की त्या विशेषांकाच्या लेखकांना बोलावून एक शेतकरी मेळावा घ्या. हे अर्थातच 'आ.सु.'च्या क्षमतांच्या बरेच बाहेर होते व आहे.

एक मुद्दा आहे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा. याबाबतच्या आकडेवारीवर सतत प्रश्नचिे लावली जातात. पी.साईनाथ, उत्सा पटनाईक, प्रभात पटनाईक वगैरे डावे विश्लेषक-वार्ताहर सांगतात की उदारीकरण हे कारण आणि आत्महत्या हे कार्य, हे निर्विवाद आहे.

उलटदिशेने औद्यगिक क्षेत्रांतल्या बेकार तरुणांच्या आत्महत्यांचा दर शेतकरी आत्महत्यांच्या दराच्या तिप्पट आहे, हे सांगणारेही अप्रत्यक्षपणे सांगतात, की शेतीकडे दुर्लक्ष करा!

आजची नव-तंत्रज्ञाने रोजगाराच्या संधी घटवत आहेत, क्षेलश्रर्शी सीुंह घडवत आहेत, असेही सप्रमाण सांगणारे आहेत!

एकूण शेतीप्रश्नांचे क्षेत्र अत्यंत व्यामिश्र, अत्यंत गुंतागुंतीचे आहे.

या परिस्थितीत कोरडवाहू गट नावाच्या तरुण अभ्यासकांच्या एका गटाने काही प्रश्न मांडून त्यांना काही उत्तरे सुचवणे सुरू केले आहे. त्यांच्या (dry-land-farming@googlegroups.com) संकेतस्थळावरचे एक निरीक्षण खाली देत आहोत.

१. शेती कशासाठी? तिचे आदर्शस्वरूप काय?

२. शेतीचे सध्याचे प्रश्न काय? आपण जे शेतीचे आदर्श स्वरूप मानतो ती त्याप्रमाणे सध्या आहे की नाही व का?

३. शेतीच्या प्रश्नांवर सध्या कोण कोण कामे करीत आहेत? त्यांची कार्यपद्धती काय? त्यातील फायदे-तोटे यावर चर्चा.

४. आपण एक गट म्हणून व व्यक्तिगत रूपात या चित्रात कोठे बसतो? बसू इच्छितो?

यातील पहिल्या टप्प्यातील चर्चा ५ जानेवारी २०१४ ला पूर्ण झाली. उपस्थित असलेल्यांमध्ये सर्वानुमते 'शेती कशासाठी? तिचे आदर्श स्वरूप काय? यावर एकमत झाले. ते खालीलप्रमाणे:

जगातील सर्व लोकांच्या अन्नाची गरज पूर्ण करणे.

- ही अन्नाची गरज शाश्वत पद्धतीने, म्हणजेच निसर्गाला हानी न पोहचविता, अनंत काळापर्यंत पूर्ण करत राहणे.
- ही अन्नाची गरज आरोग्याला हानिकारक नसलेल्या पोषक, वैविध्यपूर्ण, पुरेशा व चविष्ट अन्नाने पूर्ण करणे.
- हे अन्न असे पाहिजे की त्याच्या उत्पादन, प्रकि या, वितरण, पणन व सेवनाच्या वेळेस व त्यानंतर जे अवशेष किंवा जो कचरा निर्माण होईल (झाल्यास), त्याची नैसर्गिक पद्धतीने, अजून जास्तीचा कचरा निर्माण न करता, विल्हेवाट लावता आली पाहिजे.
- ही अन्नाची गरज लोकशाही पद्धतीने पूर्ण करणे व त्याचे उत्पादनही लोकशाही पद्धतीने करणे. म्हणजेच उत्पादनाची साधने लोकांच्या मालकीची असावी. कशाचे उत्पादन करावे व कोणते अन्न प्राशन करावे हे निवडण्याचा अधिकार लोकांचा असावा.
- शेतीच्या कक्षेत असलेल्या त्या सर्व गोष्टी करणे ज्याच्यामुळे सध्या सुरू असलेला पऱ्यावरणाचा र्हास थांबेल आणि आतापर्यंत झालेली हानी भरून निघेल.
- अन्न सार्वभौमत्व, पऱ्यावरणीय शाश्वतता व लोकशाहीच्या तत्त्वांना धरून औषधी, इंधन व शाश्वत समाजव्यवस्थेसाठी लागणाऱ्या इतर कच्च्या मालाची निर्मिती करणे.

यालाच आपण आपल्या गटाची शेतीची व्याख्या म्हणू शकतो का? किंवा यावर आधारित आपण पुढे आपल्या गटाची शेतीसंदर्भात एखादी विचारसरणी निश्चित करू शकतो का? वरील मुद्द्यांवर कोणाला काही प्रश्न, आक्षेप असल्यास किंवा अजून काही सुचवायचे असल्यास जरूर मांडावे.

शेतीची अशा प्रकारे व्याख्या केल्यामुळे आपण ज्या प्रश्नांवर काम करू ते नक्की कुठल्या मुद्द्यांशी निगडित आहेत किंवा शेतीच्या कोणत्या अंगाला त्यामुळे धक्का पोहोचतो आहे यामध्ये स्पष्टता येऊन प्रश्नांवर काम करण्यात सुसूत्रता येईल असे आम्हाला वाटते.

निराशेची आवश्यकता नाही. कोरडवाहू गटाचे सदस्य २०-३० वयाचे आहेत. त्यांना हवी ती, तेवढीच, आणि बिनशर्त मदत करता का? बोला!

सोबतच हेही लक्षात ठेवा, की चिकन वगळता सर्व प्रकारच्या अन्नधान्याची दरडोई उपलब्धता सातत्याने घटते आहे.

Vidya_nand@hotmail.com

●●●

'त्यांच्या' बायका, 'त्यांची' इभ्रत!

– राजेश्वरी देशपांडे

स्त्रीवाद समाज जीवनशैली

बायकांसंबंधीचे लेख सहसा ८ मार्चच्या निमित्ताने लिहिण्याची आपली प्रथा आहे. कारण त्या दिवशी (हल्लीच्या) भारतात बायकांचा बैलपोळा साजरा केला जातो. त्या दिवशी स्त्रियांच्या सक्षमीकरणाची, त्यांच्या आत्मनिर्भरतेची, त्यागाची, हक्कांची, मातृहृदयाची, जिद्दीची, समंजसपणाची इतकी चर्चा केली जाते की त्या उमाळ्यांनी आपले सामुदायिक सांस्कृतिक रांजण भरून वाहायला लागते. आपल्या एकंदर सार्वजनिक-सांस्कृतिक जीवनाचे उथळ व्यापारीकरण आणि माध्यमीकरण झाल्याने अलीकडे तर स्त्रियांना ८ मार्चचा दिवस म्हणजे नको त्या जाहिराती आणि सवलती' असे वाटले नाही तरच नवल ! परंतु ८ मार्चचे हे उमाळे अजून एप्रिलही सरत नाही तोच पुरते आटून आता स्त्रियांचे सक्षमीकरण तर सोडाच, पण त्यांना सार्वजनिक जीवनातून देखील हद्दपार करण्याची तयारी आपण चालवली आहे आणि त्या हद्दपारीचे नाना परीने गौरवीकरणही घडते आहे.

भारताचे नवे मसीहा नरेंद्र मोदी यांनी आपल्या पत्नीला आपल्या व्यक्तिगत जीवनातून फार पूर्वीच 'देशकार्या'साठी हद्दपार केले आणि आता निवडणुकीच्या प्रतिज्ञापत्रात पत्नीचा उल्लेख करण्याची वेळ आल्यानंतर तिला चारधाम यात्रेला धाडून प्रतीकात्मकरीत्याही हद्दपार केले आहे. मोदी पंतप्रधान व्हावेत यासाठी (तमाम देशवासीयांबरोबरच) त्यांच्या पत्नीदेखील देव पाण्यात ठेवून बसल्या आहेतच, परंतु आपले पती 'देशकार्यासाठी' आपल्याला सोडून गेले आहेत याची उदात्त जाणीव त्यांना असल्यामुळे गेल्या ४५ वर्षांत त्यांनी आपल्या पतीविषयी तक्रारीचा 'ब्र' देखील काढलेला नाही. याचे कारण त्यांची स्व-ओळख 'मोदींची पत्नी' म्हणून होती आणि आहे. मोदींच्या 'देशासाठी आणि मोहमुक्त जीवनासाठी केलेल्या सर्वसंगपरित्यागी' प्रतिमेपुढे एका सामान्य शिक्षित स्त्रीच्या लांबच लांब आयुष्याचे महत्त्व ते काय? फार पूर्वी श्री. ना. पेंडसेंच्या 'रथचक्र'मध्ये निदान कादंबरीरूपात तरी अशाच एका स्त्रीच्या वेडय़ावाकडय़ा जीवनाचा इतिहास शब्दबद्ध झाला. अन्यथा, स्त्रियांचा कधी इतिहास लिहिला जातो की काय?

स्त्रियांचा इतिहास, वर्तमान आणि भविष्य पुरुषांभोवती रचले जाते याचे दाखले आपल्याला आणि आपल्या महान संस्कृतीला नवीन नाहीत. पण आधुनिक उदारमतवादी आणि समानतेवर आधारित असे जे समकालीन वर्तमान, त्यातही स्त्रियांचे स्वतंत्र अस्तित्व निव्वळ प्रतीकात्मक पातळीवर नाही तर वास्तविकरीत्याही पुसले जाते आहे ही खरोखर शरमेची बाब. स्त्रीगर्भाच्या नि:पातातून आणि निलाजऱ्या डॉक्टरांकडून जसे हे घडते तसेच स्त्रियांवरील पाशवी अत्याचारांतूनही.पण सर्वात गहन बाब म्हणजे ते बलात्कारांच्या समर्थनातून घडते तसेच बलात्कारांना दिलेल्या फाशीविषयीच्या सार्वत्रिक समाधानातूनही घडते आहे.

मुलायमसिंह आणि अबू आझमी यांनी बलात्कारी पुरुषांचे उघड समर्थन केले आणि बलात्कारित स्त्रियांना उच्छृंखलपणाचा दोष दिला. भंवरीदेवीपासून तर चार-दोन वर्षांच्या अजाण बालिकांपर्यंत आणि खैरलांजीतल्या भोतमांगे कुटुंबातल्या स्त्रियांपासून तर गुजरातमधील दंगलीत सापडलेल्या गर्भवती स्त्रियांनी कोणता उच्छृंखलपणा केला हे समजले असते तर त्यांना तो टाळण्याचा समंजस सल्ला देता आला असता. अबू आझमींना तर स्त्री-पुरुष समानतेचा ध्यास असल्याने त्यांनी बलात्कारी पुरुषांबरोबरच बलात्कारी स्त्रियांनाही मारून टाकायचे सुचवले आहे. (दुर्दैवाने या गंभीर हिंसाचाराचा शेवट म्हणून पुष्कळ स्त्रियांना मारूनच टाकले जात असल्याने ही बाब सोपी बनली आहे.) स्त्रियांच्या दुर्दैवात भर म्हणजे मुलायमसिंह किंवा अबू आझमी ही काही अपवादात्मक उदाहरणे आता राहिली नाहीत. राष्ट्रपतींचे पुत्र अभिजित मुखर्जी असोत वा सरसंघचालक, खाप पंचायतीचे लहान-मोठे सर्वेसर्वा असोत की (बायकाच बायकांच्या शत्रू असतात, या चालीवर) लहान-मोठ्या महिला आयोगाच्या महिला सभासद- या सर्वांनी स्त्रियांवरील अत्याचारांच्या 'समस्ये'चे उत्तर म्हणून स्त्रियांना मर्यादा पाळण्याचे आवाहन वारंवार केले आहे. कुणी त्याला स्वसुरक्षेचे गोंडस कारण दिले तर कुणी भारतीय संस्कृतीच्या मर्यादशील परंपरेचे दाखले दिले. केंटुकी फ्राइड चिकन खाऊन आमचे पुरुष स्त्रियांवर अत्याचार करण्यास उद्युक्त होतात, असे खाप पंचायतीचे नेते म्हणतात तेव्हा ते आपला 'आयडेंटिटी क्रायसिस' विकलपणे पुढे मांडत असतातच, पण त्यांच्या जोडीला स्त्रियांचे साधनमात्रीकरण, वस्तूकरणही करीत असतात.

वरवर पाहता स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा डांगोरा पिटणारा आपला समाज स्त्रियांच्या साधनमात्रीकरणाचे चर्चाविश्व नाना पातळ्यांवर साकारतो आहे असे दिसेल, आणि म्हणूनच त्यात निव्वळ बलात्कारांचे समर्थन करणाऱ्यांचाच नव्हे तर बलात्कारांना फाशीची शिक्षा दिल्यानंतरच्या आपल्या विजयोन्मादाचाही गांभीर्यपूर्वक समावेश करावा लागेल. बलात्कारांना (ताबडतोब) फाशी द्या, भर चौकात फटके द्या; या घटनांसाठी जलदगती न्यायालये चालवा, वगैरे मागण्या आकर्षक आणि आपल्या आक्रमक सांस्कृतिक राष्ट्रवादात चपखल बसणाऱ्या असल्या तरी त्या अंतिमत: धोकादायक आहेत. याचे एक कारण म्हणजे या प्रकारातून स्त्रियांवरील हिंसाचाराची नोंद होण्याचे प्रमाण घटते. दुसरे म्हणजे त्यातून स्त्रीप्रश्नाचे सुलभीकरण होते. बलात्काराच्या स्वरूपातील पाशवी अत्याचार म्हणजे जणू स्त्रियांवरील अन्यायाचे एकमेव उदाहरण, असे मानून दिल्लीतील घटनेनंतरच्या गेल्या दोन वर्षांत आपण याविषयीची चर्चा चालवली आहे. या सुलभीकरणामुळे तिसरीकडे फाशीच्या शिक्षेतून स्त्रियांवरील अन्यायांचे ठसठशीत, आकर्षक आणि नाट्यमय परिमार्जन केल्याचे समाधान आपल्याला लाभते आणि उरलेले सर्व दिवस, उरलेले सर्व पुरुष स्त्रियांवर या ना त्या प्रकारचे अन्याय करण्यास मोकळे राहतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बलात्कारांना झटपट फाशी योजनेतून बलात्कार म्हणजे काहीही करून टाळण्याची गंभीर गोष्ट आणि म्हणून तो टाळण्यासाठी इतर कोणत्याही मर्यादांच्या स्वीकाराची मुरड घालण्याची स्त्रियांची तयारी, असा सगळा जिकिरीचा आणि अन्याय्य प्रवास घडतो.

बलात्काराशी सामना करण्यासाठी खऱ्या अर्थाने लागते ते कणखर मनोधर्य, उठण्याची तयारी आणि आप्तस्वकीयांचा भरघोस, खुला पाठिंबा, असा निर्वाळा या हिंसक घटनांमधून वाचलेल्या शूर स्त्रियांनी वारंवार दिला आहे. बलात्काराच्या घटना पाशवी असतात यात कोणताच प्रत्यवाय नाही. परंतु समकालीन भांडवली भणंग सांस्कृतिक-सामाजिक वास्तवाच्या चौकटीत पुरुषसत्तेचा एक विपरीत आविष्कार म्हणून अनेक स्त्रियांना अशा प्रकारच्या हिंसक घटनांना नियमितपणे वारंवार तोंड द्यावे

लागते आहे. आणि म्हणून बलात्काराच्या घटनांचा सुटा विचार करण्याऐवजी आपले कफल्लक सांस्कृतिक-सामाजिक वास्तव बदलण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करता येतील याकडे प्रामाणिकपणे लक्ष पुरवण्याची गरज आहे. भारतातील स्त्रियांवरील अन्यायाला वर्गीय-जातीय चारित्र्य असते. कौटुंबिक आणि सार्वजनिक क्षेत्रातील पुरुषसत्तेचे आविष्कार या वर्ग-जात चौकटीत बदलतात. या अर्थाने पुरुषसत्ता जात आणि वर्ग यांच्या शोषण अक्षांच्या तिपेडी गुंतागुंतीतून स्त्रियांचे (आणि पुरुषांचेही) सामाजिक वास्तव प्रवाही पद्धतीने साकारत असते. भारतातल्या कुंठित आणि भणंग भांडवली विकासाचा परिणाम म्हणून हे तिपेडी सत्तासंबंध उलथेपालथे झाले आहेत. म्हणून कधी आश्थकदृष्टय़ा सुरक्षित झाल्याने मुक्ततेचा मर्यादित अवकाश लाभलेल्या स्त्रियांवरचा सूड म्हणून, तर कधी आश्थक आणि सामाजिकदृष्टय़ाही अद्याप सरंजामी चौकटीत अडकलेल्या आणि म्हणून चटकन शोषण करता येण्याजोग्या स्त्रीवरील अन्याय म्हणून, तर कधी शहरीकरण, आधुनिकीकरण, भांडवलीकरण या त्रयीत सापडून स्त्रियांशी (आयुष्यात प्रथमच) आलेल्या समान संपर्कातून; कधी याच त्रयीत सापडून झालेल्या स्वत:च्या हतबलतेचा आणि पराभवाचा बदला म्हणून पुरुषसत्तेचे अनाकलनीय पाशवी आणि विपरीत आविष्कार आपल्या समाजात वारंवार घडताना दिसत आहेत. वडील-मुलगी, भाऊ-बहीण, शिक्षक-विद्यार्थी अशा कोणत्याही तथाकथित 'पवित्र' नात्यांची यातून सुटका झालेली दिसत नाही. इतकेच नव्हे, तर महिला आरक्षण विधेयकासंबंधीच्या चर्चेत स्त्रियांचे जात-वर्गीय चारित्र्य ठसठशीतपणे पुढे मांडून ज्यांनी उच्च वर्ण-वर्गीय स्त्रियांच्या विरोधात दलित-मागास स्त्रियांसाठी स्वतंत्र आरक्षणाची मागणी केली ते ओबीसी नेतेदेखील आता 'त्यांच्या' बायकांच्या विरोधात 'त्यांच्या' अल्लड; तरुणांचे समर्थन करताना दिसत आहेत.

सार्वजनिक क्षेत्रातल्या पुरुषसत्तेच्या दमनकारी आविष्कारावर उपाय म्हणून केवळ कौटुंबिक सुधारणा चळवळ चालवणे जसे पुरेसे ठरणार नाही (कारण तेथेही आईने मुलावर स्त्री-पुरुष समानतेचे संस्कार घडवावेत अशी अपेक्षा आपण ठेवू.) तसेच निव्वळ वर्तमान तिरपागडय़ा वास्तवाचा परिपाक म्हणून त्याची वासलात लावणे (निदान स्त्रियांना तरी) परवडणार नाही. आणि इथे राजकारणाची, सार्वजनिक क्षेत्रातल्या निर्णयप्रक्रियेची भूमिका महत्त्वाची ठरते. समाजातले भौतिक संरचनात्मक (structural-systemic) अन्याय दूर करण्याची क्षमता आणि शक्यता राजकीय व्यवहारांमध्ये असते. दुर्दैवाने आज आपण आपल्या आणि आपल्या राजकारण्यांच्या कृती-उक्तीतून एक आक्रमक, 'माचो' पौरुषत्वाला प्राधान्य देणारा, पुरुषांच्या नजरेतून स्त्री वास्तवाकडे पाहणारा आणि म्हणून 'पुरुषप्रधान' राजकीय व्यवहार साकारतो आहोत. आणि हा सर्व व्यवहार स्त्री सक्षमीकरणाच्या तोंडदेखल्या सहमतीने तोललेला असल्याने तो अधिकच जीवघेणा, अधिक उफराटा बनतो आहे.

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

rajeshwari.deshpande@gmail.com

●●●

स्त्रीच्या दु:खाचा शोध घेणाऱ्या समाजव्यवस्थेची मीमांसा

– प्रभा गणोरकर

पुस्तक परीक्षण स्त्रीवाद

'संदर्भासहित स्त्रीवाद' हा सुमारे ५८० पृष्ठांचा बृहत् -ग्रंथ प्रकाशित होणे ही एक अत्यंत स्वागतार्ह घटना आहे. हा ग्रंथ विद्या बाळ कार्यगौरव ग्रंथ' आहे आणि याची आखणी, यात समाविष्ट लेखांची मौलिकता आणि दर्जा, याने कवेत घेतलेले चर्चाविश्व यासाठी प्रथम या ग्रंथाच्या संपादकत्रयींचे मन:पूर्वक अभिनंदन केले पाहिजे. 'मिळून साऱ्याजणी'च्या संस्थापक आणि स्त्रीप्रश्नांचा सार्वत्रिक वेध घेत चळवळीला महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर सर्वदूर घेऊन जात व्यापक दिशा देणाऱ्या विद्याताईंच्या

कार्याचा हा नुसता गौरवच नाही, तर स्त्रीप्रश्नांची सर्वांगीण मांडणी, त्यासंबंधी सुरू असणारे अनेक पातळ्यांवरील काम यासंबंधीची माहिती यांचे तपशीलवार दस्तावेजीकरण या ग्रंथात झालेले असल्यामुळे एखाद्या मूल्यवान संदर्भग्रंथाचे स्वरूप या ग्रंथाला प्राप्त झालेले आहे.

स्त्रीवाद (फेमिनिझम) या १९६० नंतरच्या दोन दशकांत वेगाने जगभर पसरलेल्या पाश्चिमात्य विचारप्रणालीचा सर्वांगीण आवाका पद्धतशीरपणे कवेत घेणारा ग्रंथ मराठीत अद्याप निर्माण झालेला नाही. त्यामुळे 'स्त्रीवाद' म्हणजे कुटुंबव्यवस्थेला आव्हान देणारी पुरुषविरोधी चळवळ असा संकुचित अर्थ प्रसृत झाला आणि 'स्त्रीवादा'बद्दल गैरसमज निर्माण झाले. 'स्त्रीवादा'चे म्हणणे मान्य असणाऱ्या अनेक पुरोगामी स्त्रिया 'मी स्त्रीवादी नाही' असे म्हणत राहिल्याने 'स्त्रीवाद' ही भारतात शक्यतो टाळावी अशीच चळवळ मानली गेली आणि लोकहितवादी, फुले, आगरकर, आंबेडकर आणि महात्मा गांधी यांनी मांडलेली स्त्रीमुक्तिवादी विचारधाराच आत्मसात करून 'भारतीय संदर्भात स्त्रीवाद' असे काहीसे सबगोलंकार कडबोळे अधिक स्वीकारार्ह ठरवण्यात आले. वास्तविक पाहता 'स्त्रीवाद' उकलून दाखवीत असलेली पुरुषसत्तेची व्यापकता आणि त्यातून निर्माण झालेला लिंगभाव स्त्रीला जगण्याच्या प्रत्येक पावलावर कसा अनुभवावा लागतो, हे समजावून देणारी मांडणी होण्याची आजही गरज आहे. या ग्रंथातील काही लेख ही मांडणी करणारे आहेत हे येथे मुद्दाम नोंदवले पाहिजे. त्याचबरोबर हा ग्रंथ स्त्रीवादाचे समग्र म्हणणे काय आहे, ते सलगपणे दाखवून देणारा आणि त्याचे विश्लेषण करणारा नसला तरी भारतातील स्त्री प्रश्नांची मुख्यत: स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून चर्चा करणारा आहे. भारतातील स्त्रीप्रश्नांचे स्वरूप किती व्यापक आणि अस्वस्थ करणारे आहे, ते या ग्रंथावरून ध्यानात येते.

या ग्रंथात एकूण ५१ लेख आहेत व त्यांची काही समान सूत्रे सांभाळून बारा गटांत विभागणी केलेली आहे. धर्म आणि जातिव्यवस्था यांच्या कडेकोट बंधनांमुळे भारतातील स्त्रीविषयक प्रश्न नुसते गुंतागुंतीचेच नसून सोडवायला कठीणदेखील बनलेले आहेत. पहिल्या भागातील यशवंत सुमंत यांच्या लेखात सुमारे दीडशे वर्षांच्या काळात हिंदू-बौद्ध संस्कृती, अरबी-पर्शियन संस्कृती आणि ख्रिस्ती-पश्चिमी संस्कृतींमध्ये असहमतीच्या व विद्रोहाच्या परंपरा विकसित होऊन भारताच्या आधुनिकीकरणाच्या व ऐहिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्रियांच्या प्रश्नांचा सर्व पातळ्यांवर गांभीर्याने विचार करणाऱ्या सुधारणावादी चळवळींच्या इतिहासाची विस्तृत मांडणी आहे. या लेखाला जोडूनच असलेला 'विसाव्या शतकातील भारतातील सामाजिक परिवर्तन' हा विषय उलगडताना भारतातील सामाजिक बदलांचे स्वरूप विशिष्टतेपासून वैश्विकतेकडे कसे झुकले याचा ऊहापोह करणारा गोपाळ गुरू यांचा लेखही वाचला पाहिजे. त्यांनी आधुनिकतेमुळे वैश्विकतेला गती मिळते, आधुनिकतेत स्वातंत्र्य आणि विवेकवाद ही मूल्ये समाविष्ट असतात तसाच उदारमतवादही असतो इत्यादी गृहीतांमधील विसंगती त्यांनी स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर विशिष्ट आणि वैश्विक यांतील द्वंद्वात्मक नातेही उलगडून दाखवले आहे. भारतातील सामाजिक परिवर्तन विशिष्टाकडून वैश्विकतेकडे होत गेले असे सर्वसाधारणपणे मानले जात असले तरी स्त्रिया, दलित आणि बहुजन हे खऱ्या आधुनिकतेपासून दूरच राहिले, त्यांना वैश्विकता नाकारली गेली असे त्यांनी दाखवून दिले आहे. याच भागातला राजेश्वरी देशपांडे यांचा 'लोकशाहीचे भान, जनआंदोलने आणि स्त्री चळवळ' हा लेखही विचारप्रवर्तक आहे. सुरुवातीला, भारतीय राजकारणातील ठळक विरोधाभासांचा उल्लेख त्यांनी केला आहे. एकीकडे स्त्रियांच्या राजकीय सहभागाचा, त्यांच्या सक्षमीकरणाचा सर्वत्र गवगवा होत असताना दुसरीकडे भारतातील स्त्रीजीवनाचे वास्तव कमालीचे गंभीर, खालावलेले दिसते, तसेच स्त्रियांच्या राजकीय सहभागाविषयीची जी सहमती साकारते आहे ती कृतक आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक चळवळींचे राजकारण आकाराला येऊन त्यांनी अनेक महत्त्वाचे सामाजिक, आर्थिक प्रश्न सोडवण्याचा आग्रह धरलेला दिसत असला तरी या चळवळी व जनसंघटना भारताच्या लोकशाही राजकीय व्यवहारांवर फारशा प्रभाव टाकू शकल्या नाहीत असे निरीक्षणही त्यांनी नोंदवले आहे. स्त्री चळवळींचे या संदर्भातले अपयश त्यांनी अधोरेखित केले आहे आणि त्यामागची कारणेही स्पष्ट केली आहेत. गेल्या काही वर्षांत भांडवली ग्राहकवाद आणि जमातवादी राजकारण यांच्या

सरमिसळीतून नागरी समाजाचे स्वरूप अधिक विस्कळीत, अधिक स्पर्धात्मक आणि अधिक अन्याय्य बनत चालले असताना आणि कृतक सामुदायिक अस्मितांना खतपाणी घालणारा एक तिरपागडा नागरी समाज निर्माण होत चाललेला असताना चळवळींची आखणी कशी करायची याविषयीचा यक्षप्रश्न चळवळींसमोर निर्माण झाला आहे, असा त्यांचा निष्कर्ष आहे.

याच विभागातला प्रवीण चव्हाण यांचा 'दलित स्त्रीवाद व स्त्रीवादी दलितत्व' हा लेख काही महत्त्वाचे मुद्दे समोर ठेवणारा आहे. १९७० नंतर भारतातली स्त्रीवादी चळवळ ही मध्यमवर्गीय, उच्चजातीय व शहरी दृष्टिकोनांनी प्रभावित होती. याच काळात दलित पँथरचा उदय व दलित साहित्याच्या चळवळीचा विकास दिसत असला तरी त्यात स्त्रीप्रश्नांची स्वतंत्र नोंद घेतली पाहिजे याची जाण आढळत नाही तसेच स्त्री चळवळीने घेतलेले प्रश्न केवळ स्त्रीप्रश्न म्हणून हाताळले गेले, तर मार्क्सवादी चळवळीने 'वर्ग' ही जाणीव ठेवली. त्यात 'जात' आणि 'स्त्रीप्रश्न' यांची जाण ठेवली नाही. १९९० च्या सुमाराला 'दलित स्त्रीवादा'चे सिद्धान्तन आकाराला आले. दलित स्त्रीवादाने स्त्रीवादी चळवळीचे आंतर्बाह्य स्वरूप व विचार यांमध्ये बदल घडवण्याची गरज निर्माण केली. प्रवीण चव्हाण यांनी ही सविस्तर मांडणी करून पुढे दलित स्त्रीवादाने दिलेल्या नव्या दृष्टीने, साहित्यसमीक्षा, सौंदर्यशास्त्र, इतिहास या सर्वांकडे पाहता आले असते, पण तसे होऊ शकले नाही हे नोंदवले आहे. तसेच पुढच्या काळात 'दलित स्त्रीवादा' ऐवजी 'स्त्रीवादी दलितत्व' वाढत का गेले त्याची कारणमीमांसाही दिली आहे. 'स्त्रीवादी दलितत्व' हे दलित स्त्रीवादाला हानिकारक ठरत असल्यामुळे ते नाकारले पाहिजे हेही त्यांनी आग्रहाने सांगितले आहे.

या विभागातले अनघा तांबे यांचा स्त्रीवादी चळवळीतील लैंगिकतेच्या राजकारणासंबंधीचा लेख, चयानिका शहा यांचा 'विज्ञान लिंगभाव आणि शरीर', आनंद पवार यांचा 'स्त्रियांची समलैंगिकता आणि धर्म-पितृसत्तेचे राजकारण', हे लेख मुळातूनच वाचले पाहिजेत. स्त्रीवादाच्या चर्चाविश्वाला असणारी विविध परिमाणे या लेखांमधून दिसत जातात.

या ग्रंथातील एका स्वतंत्र भागात हिंदू, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लीम, शीख या धर्मांनी स्त्रियांकडे कसे पाहिले, त्यांच्यावर कोणती बंधने घातली किंवा मुक्तीच्या मार्गात सामावून कसे घेतले यासंबंधीची चर्चा करणारे सात लेख आहेत. या धर्मांचे स्वरूप स्पष्ट करताना या सर्वच धर्मामध्ये बदल कसे व का होत गेले याचाही विचार या सर्वच लेखांमध्ये आढळतो. सदानंद मोरे यांनी 'वैदिक धर्माचे मेटॅमॉर्फसिस' होत हिंदू धर्म अधिक खुला व उदार स्वरूपाचा कसा होत गेला त्याचा ऊहापोह केलेला आहे. भागवत धर्म हे त्याचे उन्नत रूप; तथापि आध्यात्मिक क्षेत्रात जी समता स्वीकारली गेली ती व्यवहारात आणता येणार नाही असा बुद्धिभेदही केला गेला. व्यवहारातील आर्थिक, कायिक आणि वाचिक क्षेत्रात स्त्री-पुरुष विषमता टिकवून धरली गेली, हा त्यांचा निष्कर्ष आहे.

'जैन धर्मातील स्त्री मुक्तिविचार' (प्रदीप गोखले), 'बौद्ध धर्म आणि स्त्री' (प्रतिभा पिंगळे), 'ख्रिश्चन धर्म आणि स्त्री' (गॅब्रिएला ड्रिटीच), 'मुस्लीम धर्म आणि' (फकरुद्दीन बेन्नूर), 'शीख धर्म आणि स्त्री' (सुरजित कौर चहल) हे सर्वच लेख त्या त्या धर्मांनी बाळगलेल्या व प्रसृत केलेल्या स्त्रीविषयक दृष्टिकोनांची विश्लेषक चर्चा करणारे आहेत.

चयनिका शहा यांनी 'स्त्रीच्या शरीरावरील तिचा हक्क' या विषयाच्या परिघातील अनेक मुद्दयांना स्पर्श करीत स्वत:चे अनुभव, प्रत्यक्ष काम करताना वाढत गेलेल्या ज्ञानाच्या कक्षा आणि जीवनाची समज यांचा जो आलेख मांडला आहे तो वाचकाचेही वैचारिक उन्नयन करणारा आहे. लिंग, लिंगभाव, सौंदर्य, सक्षम तशीच कमतरता असणारी शरीरे, लिंगबदलाबद्दलची सिद्धान्तने या सर्व गोष्टींचा स्त्रीवादाची सुनिश्चित आणि र्सवकष भूमिका घेत केला जाणारा विचार ही बहुसंख्य वाचकांच्या कल्पनेतही न येणारी भूमी आहे. या संदर्भातल्या अनेक गुंतागुंती, जटिल समस्या, तर्कशुद्ध, विज्ञाननिष्ठ, चिकित्सक दृष्टीने न्याहाळताना व त्यासंबंधी निर्णयात्मक बाजू घेताना चयनिका शहा यांची मानवी मन आणि शरीर समजून घेणारी संवेदन क्षमताही लख्खपणे जाणवत राहते.

जात, वर्ग, लिंगभाव यांनी आवळल्या गेलेल्या स्त्रियांच्या प्रश्नांचे अनेक पैलू या ग्रंथाने समोर ठेवले आहेत. वंदना सोनाळकर यांचा 'अर्थशास्त्राच्या परिप्रेक्ष्यातून स्त्रीप्रश्न' हाही एक महत्त्वाचा लेख आहे. मार्क्सवादी दृष्टी घेऊन स्त्रियांच्या श्रमांचा

केवळ घरातच उपयोग करून घेण्याऐवजी सामाजिक उत्पादनात त्यांचा सहभाग असण्यासाठी प्रयत्न सुरू असूनही त्यात अंतर्विरोध कसे आढळतात हे त्यांनी दाखवून दिले आहे. या संदर्भात आपला अभ्यास मांडणाऱ्या अनेक अर्थतज्ज्ञांच्या मतांची चर्चा करीत त्यांतल्या मर्यादाही त्यांनी स्पष्ट केल्या आहेत.

स्त्रियांशी निगडित समस्यांपैकी एक म्हणजे त्यांना अनुभवावा लागणारा हिंसाचार. 'हिंसा आणि स्त्रीजीवन' (कल्पना कन्नबिरन) हा लेख वाचण्यापूर्वी हिंसा आणि अहिंसा यासंबंधी तात्त्विक ऊहापोह करणारा दीप्ती गंगावणे यांचा लेख वाचला जावा अशी व्यवस्था करणाऱ्या संपादकांची समग्र दृष्टी लक्षात येते. हिंसा हे एक साधन आहे आणि हिंसेचा अवलंब न करणे नैतिकदृष्टय़ा योग्य असूनही भारतीय संस्कृतीत हिंसा अपरिहार्यच नव्हे तर इष्ट कशी मानली गेली आणि ज्या भारतीय दर्शनांनी अहिंसेला मोलाचे स्थान दिले त्यांचे अंतिम प्राप्तव्य ऐहिक नसून पारलौकिक होते याकडे या लेखात लक्ष वेधले आहे. या लेखातील विवेचन आपल्या ज्ञानाचा पैस वाढवणारे आहे.

कल्पना कन्नबिरन यांच्या लेखात स्त्रीवरील हिंसाचाराचे अंगावर शहारे आणणारे दर्शन आहे. या लेखाला पूरक ठरणारा आणखी एक महत्त्वाचा लेख फ्लॅव्हिया ॲग्नेस यांचा आहे. त्या स्त्री चळवळीतल्या अग्रणी कार्यकर्त्या आहेत, कायदेतज्ज्ञ आहेत आणि कायद्याच्या अभ्यासकही आहेत. तर्कशुद्ध व बिनतोड मांडणी हे त्यांच्या लेखाचे वैशिष्टय़ आहे आणि ते वाचकाला बांधून ठेवते. कायदाविचाराच्या इतिहासात स्त्रियांचा दृष्टिकोन कायमच वगळला गेला असल्यामुळे कायद्याच्या विचारक्षेत्रातला पक्षपात उघडकीला आणणे आणि तो दुरुस्त करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सुरुवातीलाच सांगितले आहे.

याच भागात 'जात वर्ग पितृसत्ताक प्रभुत्व आणि इज्जतीचा प्रश्न' हा संजयकुमार कांबळे यांचा लेख आहे; ज्यात घराण्यातील प्रतिष्ठेसाठी केल्या जात असलेल्या हत्यांचा गंभीर प्रश्न चर्चेसाठी घेतला आहे. जया बागडे यांचा 'समान नागरी कायदा' हा लेख हिंदू वारसा कायदा, अल्पसंख्याकांचे व्यक्तिगत कायदे, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह– त्यांतून निर्माण होणाऱ्या जातिधर्माच्या, आर्थिक हक्कांच्या गुंतागुंती अशा अनेक मुद्दय़ांची चर्चा करणारा आहे. या लेखात पारसी, ख्रिश्चन, मुस्लीम कायद्यांमधील तरतुदींवर प्रकाश टाकलेला आहे आणि त्यांतील त्रुटींचाही उल्लेख केलेला आहे.

या बृहत्ग्रंथातील सर्व लेखांचा आढावा घेणे अशक्य आहे; तथापि ज्यांचा येथे काहीसा सविस्तर उल्लेख केला आहे त्यांचा आवाका, मांडणीतील र्सवकषता आणि अधिकृतता लक्षात घेता या ग'थाचे ऐतिहासिक मोल कळून येईल.

'संदर्भासहित' स्त्रीवाद मांडताना त्याचे अनेकविध संदर्भ आवाक्यात घेऊन त्या त्या क्षेत्रातल्या अधिकारी, विद्वान आणि स्त्री चळवळीशी बांधीलकी असणाऱ्या आणि स्त्रीवादाचा संदर्भ सतत बाळगणाऱ्या लेखकांची निवड करणे, त्यातल्या काहींच्या लेखांचे अनुवाद करणे आणि स्त्री प्रश्नांना असणारे बहुविध आयाम वाचकांच्या समोर उलगडणे हे संपादकीय कर्तृत्व दाद देण्यासारखेच आहे.

'स्त्रीवाद' या विचारप्रणालीची तत्त्वे, परीघ आणि व्याप्ती तसेच महत्त्व स्पष्ट करणारे इतरही लेख या ग्रंथात आहेत. जास्वंदी वांबुरकर, अरुणा पेंडसे यांचे लेख स्त्रीवादाचा इतिहास व विकास स्पष्ट करणारे आहे. स्त्रीवादात अंतर्भूत असलेल्या आणि भारतात अधिक भीषण होत चाललेल्या स्त्रीविषयक विविध समस्यांची चर्चा करणारे 'बहुजन स्त्रीची लैंगिकता आणि जात' (संध्या नरे–पवार), 'मराठा जात आणि पितृसत्ता' (मीनल जगताप), 'दलित स्त्रिया, मुले आणि त्यांच्या पोषणाची सद्य:स्थिती' (सुखदेव थोरात, निधी सभरवाल), 'स्त्री आरोग्याचा लेखाजोखा' (अनंत फडके), 'स्त्रीशिक्षणाचे धोरण : लिंगभाव समतेचा भ्रम' (अनिल सद्गोपाल), 'स्त्रियांच्या शिक्षणात बाजारीकरणाचा अडथळा' (संजय दाभाडे) असे लेखही आहेत. स्त्रीवादी साहित्यासंबंधीही प्रज्ञा पवार, रेखा इनामदार साने, वंदना बोकील कुलकर्णी आणि नीलिमा गुंडी यांचे लेख आहेत. 'नारी समता मंच', 'पुरुष उवाच' आणि 'मिळून साऱ्याजणी' यांनी स्त्री प्रश्नांच्या संदर्भात केलेल्या वाटचालीतले महत्त्वाचे टप्पे नोंदवत, त्यांच्या कार्याच्या व्याप्तीवर प्रकाश टाकणारा लेख गीताली वि. मं. यांनी लिहिलेला आहे. जयदेव डोळे यांनी 'बला, सबला,

गलबला' यात स्त्री चळवळींकडे पाहण्याची माध्यमे व पत्रकारिता यांची उथळ, अपुरी आणि विरोधी दृष्टी यांचे सडेतोड व मर्मभेदी विश्लेषण केले आहे.

या ग्रंथातील संदर्भग्रंथांची नावे जरी वाचली तरी आजही ज्ञानक्षेत्रात समरसून जाणारे, माहिती आणि विश्लेषण, प्रत्यक्ष कार्य आणि त्याची चिकित्सा करू शकणारे किती विद्वान लेखक आहेत हे पाहून आपल्याला भारावून जायला होते. हे संदर्भग्रंथ स्त्रीविषयक प्रश्नांची मूलभूत व मौलिक चर्चा करणारे आधारस्तंभ मानले पाहिजेत आणि त्यांच्या आधाराने वाचकानेही स्वत:ची पुढची वाटचाल केली पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे वंदना भागवत यांचा 'प्रास्ताविक चिंतन' हा जवळजवळ ४० पृष्ठांचा संपृक्त लेख स्त्रीवादाची व्यापक मांडणी करणारा आहे. वंदना भागवत यांचा व्यासंग आणि विस्तृत परिप्रेक्ष्यातून विषय समजावून घेण्याची वृत्ती यातून दिसते. मांडणी करताना मुद्दय़ातून उपमुद्दे उपस्थित करण्याची त्यांची शैली असल्यामुळे काही वेळा मजकूर पुन:पुन्हा वाचावा लागणे ही वाचक म्हणून माझी मर्यादा असू शकते. तरीही वाचताना त्यातल्या आवेगामुळे, आपली दमछाक करणारे हे लेखन आहे असे मला पुन:पुन्हा जाणवत राहिले. शिवाय, माझा आणखी एक आक्षेप असा आहे की, त्या सतत प्रश्न उपस्थित करतात. मुद्दा मांडताना प्रश्न उपस्थित करणे हे एखाद्या गोष्टीच्या विविध बाजू तपासून पाहण्याच्या चिकित्सक वृत्तीचे लक्षण आहे ही चांगली गोष्ट आहे, पण मला असेही वाटले की, चाळीस पृष्ठांच्या या लेखात त्यांनी सुमारे पन्नास प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यातल्या अनेक प्रश्नांची खरे तर गरज नाही, शिवाय अनेक प्रश्न असे आहेत की, ज्यांची नेमकी आणि नि:संदिग्ध उत्तरे मला त्यांच्याकडूनच हवी आहेत, ती त्या देऊ शकतात. त्यांच्या लेखातल्या अनेक मुद्दय़ांवर चर्चा करणे किंवा होणेही मला आवडेल. पण असे असूनही ज्या तडफेने, निश्चित भूमिकेने, सर्वांगीण विश्लेषक वृत्तीने त्यांनी हा ग्रंथ सिद्ध केला आहे, त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करणेच मला अधिक आवडते आहे.

'संदर्भासहित स्त्रीवाद'

संपादक : वंदना भागवत, अनिल सकपाळ आणि गीताली वि.मं.,

शब्द पब्लिकेशन्स, मुंबई, पृष्ठे: ५८० , मूल्य : ७०० रुपये.

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

vasantprabha@yahoo.com

●●●

'हैदर' आणि 'डॉ. प्रकाश बाबा आमटे'

–सुभाष थोरात

चित्रपट परीक्षण धर्म समाज

सुप्रसिध्द दिग्दर्शक विशाल भारव्दाज यांचा 'हैदर' आणि 'समृद्धी' पोरे यांचा 'डॉ. प्रकाश बाबा आमटे' हे चित्रपट आपल्या समाजापुढील अत्यंत महत्त्वाचे प्रश्न पुढे आणतात. जरी या चित्रपटांचा हेतू वेगळा असला तरी या चित्रपटांतून या विषयांची मांडणी अतिशय समर्थपणे पुढे येते. एक विषय काश्मीरमधील दहशतवादाचा, जो हैदरमध्ये हाताळला आहे. तर दुसरा नक्षलवादाचा, जो डॉ. प्रकाश बाबा आमटे या चित्रपटात हाताळला आहे. वर म्हटल्याप्रमाणे हे विषय या चित्रपटांचे मूळ विषय नाहीत. पण चित्रपटाच्या मुख्य विषयांच्या अनुषंगाने हे विषय अपरिहार्यपणे या चित्रपटात दाखल झाले आहेत आणि या प्रश्नांमुळेच या चित्रपटांना गांभीर्य आणि खोली प्राप्त झालेली आहे.

विशाल भारद्वाज यांचे चित्रपट नेहमीच शेक्सपियरच्या नाटकांवर आधारित असतात. या नाटकांची थीम घेऊन भारतीय तपशील त्यात भरून नवीन कलाकृती समोर आणतात. मग तो मकबूल असो, ओंकारा असो अगर आत्ताचा हैदर असो. हैदर शेक्सपियरच्या जगप्रसिध्द हॅम्लेट नाटकाच्या थीमवर बेतलेला आहे. काश्मीरमधील दहशतवादाची पार्श्वभूमी घेऊन त्यांनी ही थीम नवीन स्वरूपात सादर केलेली आहे. काश्मीरमधील दहशतवादाला अनेक पदर आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर चालू असलेल्या मुस्लिम राष्ट्रातील घडामोडी, अफगाणिस्तान, पाकिस्तान, तालीबान यांचे राजकारण, भारतीय लष्कराच्या कारवाया हाही एक पदर त्या दहशतवादाला आहे. जरी असे अनेक पदर काश्मिरी दहशतवादाला असले तरी मूळ मुद्दा आहे काश्मिरी जनतेच्या विकासाचा आणि काश्मीर भारतात सामील होण्यासाठी राजा हरिसिंग बरोबर केलेल्या कराराचा. या सर्वातून काश्मीरमधील परिस्थिती उद्भवली आहे. त्यात भर पडली आहे गेल्या दोन दशकात काश्मीरसाठी असलेल्या ३७०व्या कलमाला सातत्याने विरोध करणाऱ्या हिंदू धर्मांध शक्तींच्यात होणाऱ्या वाढीची. आज या शक्ती सत्तेवर आहेत. हिंदू धर्मांध शक्ती आणि मुस्लिम धर्मांध शक्ती यांमधील राजकारण नेहमीच परस्परांना पोषक असते आणि त्यात बळी जातो तो दोन्ही बाजूंच्या निरपराध जनतेचा. काश्मीरमधील दहशतवादाला पाकिस्तानची फूस आहे असे सांगून मूळ मुद्दा बाजूला सारण्याचा केंद्र सरकारचा नेहमीच प्रयत्न राहीलेला आहे. त्यामुळे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून काश्मीरकडे पाहिले जाते आणि तेथे लष्कराला विशेष अधिकार देणारा कायदा लागू केला जातो.

हैदर चित्रपटाच्या पूर्वार्धात या लष्कराच्या विशेष अधिकार कायद्यामुळे दहशतवाद आटोक्यात येण्याऐवजी उलट कसा वाढत जातो याचे प्रत्ययकारी चित्रण करण्यात आलेले आहे. दहशतवादी म्हणून सर्वसामान्य जनतेचालष्कराने जो अमानुष छळ चालवला आहे त्यामुळे लष्कराबद्दलचा अतोनात संताप काश्मीरी जनतेत साठून आहे आणि तो काश्मिरी तरूणांना दहशतवादाकडे ढकलत आहे. एखाद्या दहशतवाद्याला मारले की लष्करी जवानांना, अधिकाऱ्यांना बक्षिस, बढती मिळते. त्यामुळे अनेक तरूणांना मारून त्यांना दहशतवादी ठरवले जाते आणि बक्षिसे मिळविली जातात. हैदरमध्ये भारतीय लष्कराची ही काळी बाजू विशाल भारव्दाज यांनी खूपचगांभीर्याने पुढे आणली आहे. काश्मिरी जनतेला विश्वास देण्याची आणि विश्वासात घेण्याची गरज आहे. दहशतवादाच्या नावाखाली तिथे जे शिरकाण केले जात आहे त्यातून दहशतवाद कधीच संपणार नाही हेच त्यांना यातून सांगायचे आहे.

हैदरचा उत्तरार्ध मात्र पूर्ण घसरलेला आहे. सुरूवातीला सर्व समाजाच्या संदर्भात मांडणी करणारा हा चित्रपट हळूहळू एका कुटुंबावर आणि त्याच्या शोकांतिकेवर घसरत जातो आणि हे घसरणे एखाद्या गल्लाभरू हिंदी चित्रपटाला साजेसे आहे.

समृध्दी पोरे यांचा डॉ. प्रकाश आमटे हा चित्रपट तर सत्यकथाच आहे. त्यामुळे तेथे कल्पनेला वाव नाही आणि तेथे दिग्दर्शकाला स्वत:च्या मनातील काहीही टाकणे शक्यच नाही. डॉ. प्रकाश आमटे यांचे 'प्रकाश वाटा ' नावाचे आत्मकथनात्मक पुस्तक आहे. या पुस्तकाचा तोच आधार आहे. बाबा आमटे यांच्यासारखेच डॉ. प्रकाश आणि मंदा आमटे हे जिवंतपणीच दंतकथा बनले आहेत. त्यांच्या जिवंतपणीच त्यांची जीवनकथासांगणारा हा चित्रपट जशी त्यांच्या त्यागाची, चिकाटीची, गोरगरीब जनतेबद्दल वाटणाऱ्या प्रेमाची कहाणी आहे तसाच भारतीय स्वातंत्र्याच्या ६५ वर्षानंतरही आदिवासी समजल्या जाणाऱ्या जनतेला साध्या आरोग्याच्या सुविधाही नाहीत, ते जणू भारतीय नागरिकच नाहीत अशी त्यांची आजची अवस्था आहे.

या पार्श्वभूमीवर डॉ. प्रकाश आणि मंदा आमटे यांचे कार्य सूर्यप्रकाशासारखे उठून दिसते. सुखासीन जीवनाची संधी नाकारून हे डॉक्टर जोडपे अतिशय खडतर अशा जंगलातील जीवनाशी सामना करीत आदिवासी समाजाला आधार देण्याचे, समाजात जागृती करण्याचे आणि त्याला आधुनिक समजल्या जाणाऱ्या समाज प्रवाहाशी जोडण्याचे काम निस्वार्थ पध्दतीने करीत आहे ही गोष्ट आजच्या चंगळवादी समाजाच्या पातळीवर अतिशय दुर्लभ अशी आहे. बाबा आमटे यांनी समाजाने कचऱ्यासारखे टाकून दिलेल्या कुष्ठरोग्यांना पुन्हा मानवी समाजात प्रतिष्ठा देण्याचे आणि त्यांच्या पूर्ण करपलेल्या जीवनात आनंद फुलविण्याचे काम केले. त्यांचा वारसा डॉ. प्रकाश आणि मंदा आमटे यांनी सार्थपणे पुढे चालविला आहे.

समृद्धी पोरे यांनी ही कथा चित्रपटीय भाषेत अतिशय समर्थपणे सादर केली आहे. कारण अशा कथा या माहितीपट म्हणून पुढे येतात तस त्यांनी होऊ दिलेले नाही. डॉ. प्रकाश आणि मंदा आमटे हे कोणीतरी आकाशातून उतरलेले देवदुत आहेत अशी पूर्णपणे गौरवांकित मांडणी त्यांनी केलेली नाही. तर एक सर्वसामान्य माणूस आणि त्याची जडण घडण, त्याचे प्रेम, राग, लोभ, दु:ख हे सर्व त्यांनी छान टिपले आहे. त्यांच्या या सादरीकरणाला तितक्याच समर्थपणे अभिनयाची झूल चढवली आहे नाना पाटेकर आणि सोनाली कुलकर्णी यांनी. त्यामुळे हा चित्रपट चित्रपट म्हणून देखणा झाला आहे आणि हृदयाला भिडणारा झाला आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी लोकांची जी गर्दी होत आहे ती समाजात अजूनही संवेदनशीलता आणि शहाणपण शिल्लक आहे याची पावतीच आहे. प्रगतीशील मूल्यांच्या आजच्या घसरणीच्या काळात ही गोष्ट आश्वासक आहे.

डॉ. प्रकाश आणि मंदा आमटे यांचे काम भामरागड, गडचिरोली या परिसरात असल्यामुळे त्यांचा नक्षलवाद्यांशी संबंध येणे अपरिहार्य आहे. त्यामुळे चित्रपटात त्याचे संदर्भ येणेही अपरिहार्य आहे. आंध्र प्रदेशच्या सीमेला लागून असलेल्या या परिसरात माडिया या आदिवासी जनसमुहांची वस्ती आहे.आज जरी त्यांची थोडीफार प्रगती झाली असली तरी ते विकासाच्या अंगाने विकासाच्या मूळ प्रवाहापासून कोसो दूर आहेत. अगदी आदीम म्हणावे असे आयुष्य जगत आहेत. पोलिसयंत्रणा, फॉरेस्ट खाते. तेंदुपत्याचे ठेकेदार यांच्या अमानुष शोषणाची वर्षानुवर्षे शिकार झालेले हे आदिवासी जनसमूह नक्षलवादाची शिकार होणे स्वाभाविकच आहे.

डॉ. प्रकाश आमटे यांच्या सोबत काम करणारे विलास मनोहर यांनी 'एका नक्षलवाद्याचा जन्म' नावाचे एक चांगले पुस्तक लिहिले आहे. आदिवासी जनसमुहांच्या शोषणाचा बारकाईने धांडोळा घेताना त्यांनी सरकारी यंत्रणा नक्षलवादाच्या नावाखाली त्यांचा छळ करून त्यांना नक्षलवादी बनण्यास कशी भाग पाडते याचे चांगले चित्रण केले आहे. त्यामुळे जे लोक सामान्यपणे कष्ट करून आपले आयुष्य जगू इच्छितात तेही सरकारी यंत्रणांच्या विरोधी जाऊन पर्याय म्हणून बंदुक जवळ करतात. एकतर नक्षल समस्या ही कायदा सुव्यवस्थेची समस्या आहे हा सरकारी दृष्टीकोन, आदिवासी जनतेशी संबंधीत खात्याचे असणारे अधिकाऱ्यांचे आदिवासी जनतेबरोबरचे कायम अमानवी वर्तन, अगदी त्यांच्या हक्काचे राशन आदिवासी जनतेला मिळू न देणे, सातत्याने त्यांना अपमानित करून शिवीगाळ करणे यातूनच प्रतिकाराची भावना निर्माण होते आणि मग ते उपलब्ध असलेला नक्षल पर्याय स्वीकारतात. शेजारच्या आंध्र मधून येणारे अण्णा (नक्षल) याचा बरोबर फायदा उठवतात आणि नक्षल चळवळ फोफावते. पोलीस किंवा नक्षलविरोधी पोलीस दल निरपराध आदिवासी तरूणांना नक्षल म्हणून गोळ्या घालून ही चळवळ आणखी वाढवण्यास मदत करतात. जी गोष्ट आपण जम्मू-काश्मीरमध्ये पाहिली आहे.

डॉ. प्रकाश आमटे यांची या प्रश्नावरची भूमिका तटस्थ आहे. अशा स्वरूपाचे काम करताना तशीच भूमिका असणे गरजेचे आहे. पण असे असले तरी त्यांची सहानुभूती पूर्णपणे आदिवासी जनतेला आहे. एका बाजूला सरकार आणि दुसऱ्या बाजूला नक्षल आंदोलन आणि यांच्या कोंडीत आदिवासी जनसमूह अडकलेला आहे. 'बाप भीक मागू देईना आणि आई जेवू घालेना' अशी त्यांची अवस्था झाली आहे. यातूनच तो बंदुकीकडे वळतो किंवा बंदुकीला बळी पडतो. डॉ. प्रकाश आणि मंदा आमटे यांनी त्यांच्यासाठी आरोग्यसुविधांबरोबर शिक्षणाच्या सोयी उपलब्ध केल्या आहेत. अशा प्रकल्पांना सरकारने भरभक्कमपणे मदत करून आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. पण तीही बोंब आहेच. उदा. जंगलात जे प्राणी, पक्षी जखमी होतात असे प्राणी, पक्षी घेऊन आदिवासी लोक डॉ. प्रकाश यांच्याकडे येतात. डॉ. प्रकाश अशा प्राण्यांना औषधोपचार करून जगवतात. असे प्राणी, पक्षी परत जंगलातील जीवन जगू शकत नाहीत. अशावेळी त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी डॉ. प्रकाश यांनीच घेतली. असे अनेक प्राणी त्यामध्ये वाघ, बिबटे, तरस, अस्वल, रानगायी, रानकुत्रे, साप यांचा समावेश आहे. पण याची पार्श्वभूमी लक्षात न घेता सरकारच्या वन खात्याने असे प्राणी-पक्षी पाळण्यास बंदी घातली आहे, असे कारण देऊन ते जप्त करण्याचे ठरविले होते. हे प्राणी, पक्षी वाचविण्यासाठी डॉ. प्रकाश यांना खूपच धडपड करावी लागली होती.

म्हणजे सरकारी कारभाराचा हा एक नमुना आहे. असो. भारतातच नव्हे तर जगभरातच बाबा आमटे, विकास आमटे, डॉ. प्रकाश आमटे, मंदा आमटे अभय बंग, राणी बंग असे किती तरी सहृदयी लोक आहेत की जे संतांचेच कार्य वेगवेगळ्या स्वरूपात करीत आहेत. मानवी विकास सरळ रेषेत जाणारी गोष्ट नाही. या विकासाला मानवी शोषणाची एक भयंकर बाजू आहे, ज्यामुळेच हे सर्व प्रयत्न उभे राहातात. मूळ मुद्दा आहे शोषणरहित विकासाचा, शोषणरहित समाजाचा. जो अंतिम उपाय आहे.

अंतिम ध्येयाच्या या खडतर प्रवासात वरील व्यक्ति मानवी जीवनात जेथे पूर्ण वाळवंट आहे अशा ठिकाणी थोडीफार हिरवळ निर्माण करण्याचे कार्य करतात ते कार्य मोठे आहे. अशा कार्यात आपल्यालाही काही हातभार लावता आला तर आनंदवन निर्माण करणाऱ्यांना हिंमत मिळू शकेल.

'जीवनमार्ग' च्या सौजन्याने

kiranm.subhasht@gmail.com

●●●

प्रश्न शिक्षणाच्या गुणवत्तेचा!

– नीलेश नीमकर

शिक्षण समाज

शालेय शिक्षणाची गुणवत्ता म्हणजे नेमके काय या बाबत बरीच मतमतांतरे असली तरी, सध्या ती फारशी बरी नाही, याबाबत तज्ज्ञ आणि सामान्य या दोघांतही एकवाक्यता असल्याचे दिसते. गेल्या काही दशकांत राज्यातली शाळांची यंत्रणा फार वेगाने विस्तारली आहे. काही अतिदुर्गम भागांचा अपवाद वगळला तर जवळ शाळा नाही म्हणून शिक्षण मिळत नाही अशी स्थिती नक्कीच नाही. ग्रामीण भागात शिक्षक आणि विद्यार्थी यांचे गुणोत्तरही बऱ्याच वेळा एका शिक्षकामागे तीस पस्तीस मुले, म्हणजे आदर्श म्हणावे, असे असते. एकूणच शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आपण बरीच मजल मारली आहे. मात्र मूल शाळेत आहे, म्हणजे त्याचे व्यवस्थित शिक्षण होते आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. शासकीय व खाजगी संस्थांनी केलेल्या अनेक सर्वेक्षणांतून वारंवार एक बाब पुढे आली आहे की, मुलांनी एखाद्या इयत्तेत जे काही शिकणे अपेक्षित असते, त्यापेक्षा ती बरेच कमी शिकतात. त्यामुळे शाळेत येणारी मुले शिकती व्हावीत यासाठी काही ठोस पावले उचलणे गरजेचे झाले आहे.

अगदी शालेय पातळीवरील औपचारिक शिक्षणात यशस्वी व्हायचे म्हटले तरी वाचन, लेखन व पायाभूत अंकगणितावर उत्तम पकड असणे गरजेचे आहे. कारण ही साक्षरता हे ज्ञान मिळवण्याचे पायाभूत साधन आहे. मात्र आज अनेकदा मुले पाचवी–सहावीत येऊनही त्यांचे वाचन–लेखनावर म्हणावे असे प्रभुत्व येत नाही. परिणामत: त्यांना वेगाने विस्तारणारे इतर विषय शिकणे अवघड होऊ लागते. शाळेत अनेक वर्षे जाऊनही मुलांना अगदी पायाभूत असणारी ही कौशल्ये का येत नाहीत, याची अनेक कारणे असू शकतात. यात मुलांना उपलब्ध असणाऱ्या वाचनसंधीपासून ते शिकवण्याच्या पद्धतीपर्यंत अनेक घटक येतात.

वाचायला–लिहायला शिकणे ही मानसिक पातळीवर बरीच गुंतागुंतीची क्रिया आहे. मात्र शिक्षकांना या साऱ्या गुंतागुंतीची माहिती असेलच असे नाही. कारण बऱ्याच वेळा हा भाग शिक्षकांच्या सेवापूर्व वा सेवांतर्गत शिक्षणात पुरेसा विस्ताराने येतच नाही. ज्या देशांत साक्षरतेचे प्रमाण उत्तम आहे अशा सर्वच देशांत आरंभिक साक्षरता हा विषय विद्यापीठीय पातळीवर एक महत्त्वाचा संशोधनाचा विषय म्हणून अभ्यासला जातो. आपल्याकडे मात्र काही मोजके अपवाद वगळता या विषयावर फारसे संशोधन नाही. म्हणूनच शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबांधित असा हा कळीचा मुद्दा सोडवण्यासाठी काही दीर्घकालीन तर काही अल्पकालीन अशा उपाययोजना कराव्या लागतील. दीर्घकालीन उपाययोजनांत विद्यापीठीय पातळीवर या विषयातील संशोधनाला प्रोत्साहन देणे, शिक्षकांच्या सेवापूर्व प्रशिक्षणात आरंभिक साक्षरता या विषयावर पुरेसा भर देणे यांसारख्या उपाय योजना येतील. तर अल्पकालीन उपाय योजनांत मिशन मोडमध्ये काम करावे लागेल. यात सध्या वाचन–

लेखनात मागे पडलेल्या मुलांचा नेमका स्तर जाणून घेऊन त्यांना उपचारात्मक कार्यक्रम देणे, मुले मागे पडू नयेत यासाठी इयत्ता पहिली ते तिसरीच्या शिक्षकांना विशेष सुनियोजित दीर्घकालीन प्रशिक्षण देणे. ग्रामीण भागात बालसाहित्य उपलब्ध करून देणे, शाळांमध्ये फिरती ग्रंथालये सुरू करणे असे उपाय योजावे लागतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राज्याच्या पातळीवर आरंभिक-साक्षरता धोरण आखावे लागेल. हे धोरण आखताना या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती, विद्यापीठे, डउएठढ व ऊखएढ यांसारख्या शासकीय संस्था, या सर्वांचा सक्रीय सहभाग लागेल.

पुढील काही वर्षे भारतातील बरीच लोकसंख्या तरुण असणार आणि याचा फायदा देशाला होईल, ही बाब आज वारंवार चर्चिली जात आहे. मात्र त्या तरुणांपैकी बरेचजण आज शाळेत असणार आहेत. त्यांची वाचन-लेखनादी पायाभूत कौशल्ये विकसित न होणे ही बाब आपल्याला परवडणारी नाही.

शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबंधित अजून एक महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक. शिक्षकांच्या सेवापूर्व शिक्षणाची आजची स्थिती फार विचित्र आहे. ज्या वेळी राज्याची शिक्षण व्यवस्था वेगाने विस्तारत होती, त्या वेळी प्रशिक्षित शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर गरज होती. ती पूर्ण करण्यासाठी विनाअनुदानित तत्त्वावर शिक्षक प्रशिक्षण संस्था गावोगावी उभ्या राहिल्या. यातील बहुसंख्य संस्थांतून दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा दर्जा सुमार होता. पण नोकरीची हमी असल्यामुळे सुरुवातीला या संस्थांना काही काळ हवी तेवढी फी भरून विद्यार्थी मिळाले. मात्र गेल्या काही वर्षांत, ऊएव. होऊनही नोकरी मिळत नाही, हा अनुभव आल्याने या प्रशिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांचा ओघ आटला आहे. यातील अनेक शिक्षण संस्था बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. शासकीय अध्यापक महाविद्यालयांची स्थितीही काही वेगळी नाही. एकूणच राज्यात काही काळापूर्वी भरभराटीला आलेली शिक्षकांच्या सेवापूर्व शिक्षणाची यंत्रणा आज मोडकळीला आली आहे. या यंत्रणेचे भवितव्य काय, यावर साधक बाधक विचार होऊन धोरण निश्चित करणे गरजेचे आहे. तसेच या यंत्रणेतून तयार झालेल्या व आज बेकार असणाऱ्या व्यक्तींचे काय करायचे, हाही प्रश्न आहेच. या बेकार असणाऱ्या व्यक्तींना अधिक सघन प्रशिक्षण देऊन माध्यमिक स्तरावरील मागे पडलेल्या मुलांना विशेष मार्गदर्शन करणारी एक मदत यंत्रणा उभी करणे शक्य आहे. किंवा विशेष प्रशिक्षण देऊन अंगणवाडी व बालवाडीतील बालशिक्षण सबलीकरणाची जवाबदारी घेणारी व्यवस्था उभारणेही शक्य आहे. मात्र या साठी काळजीपूर्वक योजना आखणे गरजेचे आहे.

शिक्षकांच्या सेवापूर्व शिक्षणाइतकाच महत्त्वाचा प्रश्न सेवांतर्गत शिक्षणाचा आहे. आजवर आपले सेवांतर्गत प्रशिक्षण बरेचसे इंग्रजीत ज्याला 'adhock' म्हणतात अशा प्रकारचे झाले आहे. या बाबतचे दीर्घकालीन (सुमारे पाच वर्षांचे) नियोजन राज्य, जिल्हा वा तालुका यापैकी कोणत्याच स्तरावर केले जात नाही. तसेच या प्रशिक्षणांचा उपयोग होतो आहे की नाही, हे तपासण्याची काही यंत्रणाही आपल्याकडे नाही. खरेतर या क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या मते एखाद्या विषयावर पकड यायला शिक्षकांना अनेक दिवसांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लागते. एखादी कार्यशाळा घेतली म्हणजे शिक्षक वर्गात लगेच बदल करू शकतील असे नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर शिक्षकांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन करायचे म्हणजे तंत्रज्ञानाचा आधार घ्यावा लागेल. यात मुळातच शिक्षकांचा एक मध्यवर्ती डाटाबेस तयार करून त्यांच्या प्रशिक्षणाची माहिती उपलब्ध होणे गरजेचे आहे. तसेच काही भाग कार्यशाळेत तर काही भाग ऑनलाईन अशा स्वरूपात प्रशिक्षणांचे नियोजन करावे लागेल. अशा स्वरूपाचा एक प्रयत्न युनीसेफच्या सहकार्याने जालना जिल्ह्यात अगदी लहान प्रमाणावर करण्यात आला असून त्याचे सुपरिणाम दिसून आले आहेत. या प्रकारच्या प्रयोगांचा सखोल अभ्यास करून त्यांचा वापर मोठ्या प्रमाणावरील व्यापक प्रश्न सोडवण्यासाठी नक्कीच करता येईल. खरेतर अशा स्वरूपाचे विविध विषयांचे प्रशिक्षण कार्यक्रम ऑनलाईन उपलब्ध करून दिल्यास शिक्षकांना त्यांच्या गरजेचे कार्यक म निवडून त्यात सहभागी होता येईल. मात्र असे कार्यक्रम तयार करण्यासाठी काही वर्षे मेहनत करावी लागेल.

शिक्षणाच्या गुणवत्तेचे प्रश्न सोडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याची कल्पना अनेकदा केली जाते. मात्र तंत्रज्ञान नेमके कसे आणि कशासाठी वापरायचे हे निश्चित व्हायला हवे. यात महत्त्वाचा मुद्दा असा की शिक्षकाला पर्याय म्हणून तंत्रज्ञान शालेय

स्तरावर आज तरी (कदाचित कधीच!) वापरता येणार नाही. मात्र शिक्षकाचे काम अधिक प्रभावी व्हावे म्हणून ते नक्कीच वापरता येईल. याचे एक छोटेसे उदाहरण आपण पाहू या. सामान्यपणे शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणात प्रत्यक्ष वर्गातील कामाचा अनुभव त्यांना देणे शक्य नाही. कारण नेमका प्रशिक्षणाच्या वेळी हवा असलेला वर्ग उपलब्ध असेलच असे नाही. तसेच वर्गातील एखादा घटक शिकवण्याचे काम पाच-सहा दिवस चालले, तर तेवढे दिवस प्रशिक्षण लांबवणेही शक्य नाही. मात्र वर्गातील कामाच्या व्हिडीओ फिल्म उपलब्ध असतील तर त्या प्रशिक्षण कार्यशाळेत प्रभावीपणे वापरता येतात. शिक्षक त्यांच्या गरजेप्रमाणे कितीही वेळा तो वर्ग पाहू शकतात. शिक्षक-प्रशिक्षक फिल्म मध्येच थांबवून त्यावर चर्चा घडवून आणू शकतात. एकूणच तंत्रज्ञानाच्या वापरामुळे प्रशिक्षणाचा दर्जा बराच उंचावू शकतो. अशा प्रकारचे व्हिडिओ निर्माण करणे हे वेळखाऊ असले तरी ते एक कायमस्वरूपी काम होईल. आमच्या 'क्वेस्ट' या संस्थेतर्फे अशा सुमारे ६० व्हिडीओंचा संग्रह ु.quest.org.in या वेबसाईट वरून विनामूल्य उपल्ब्ध करून देण्यात आला आहे. अभ्यासक' माची एकूण गरज लक्षात घेता ही संख्या काही फार नाही. पण याकडे एक सुरुवात म्हणून पाहिले पाहिजे. बालचित्रवाणी सारखी संस्था या क्षेत्रात भरीव काम करू शकेल. मात्र पुन्हा, त्यासाठी धोरणात्मक निर्णय आवश्यक आहे.

शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबंधित काही प्रश्न व काही संभाव्य उत्तरे यांचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न मी या लेखात केला आहे. तो परिपूर्ण आहे असे नाही. मात्र, या निमित्ताने चर्चा सुरू झाली तरी हा प्रयत्न सुफळ झाला, असे म्हणावे लागेल. या चर्चेतून पुढे आलेल्या मुद्द्यांची दखल घेऊन नवे सरकार काही धोरणात्मक निर्णय करेल अशी अपेक्षा आहे.

'महाराष्ट्र टाइम्स'च्या सौजन्याने

nilesh.nimkar@quest.org.in.

●●●

धर्महीन लोकांचे चिमुकले विश्व

सर्वात मोठी गंमत ही, की धर्म न पाळणारी नास्तिक माणसे धर्माच्या मूलतत्त्वांचे अत्यंत सहजतेने पालन करताना आढळतात. आणि देव देव करणारी, धर्माबद्दल गर्व बाळगणारी माणसे ती मूल्ये पायदळी तुडवताना दिसतात.

आपल्या बांधवांशी बंधुत्वाने वागायला धर्महीन लोकांना स्वर्गाची वा मोक्षाची लालूच दाखवावी लागत नाही की नरकाची भीती. फळाची आशा न धरता सदभावनेने आपले कर्तव्य तीच पार पाडतात.

आणि हे करताना आपण फार मोठे काही तरी करत आहोत असे त्यांच्या मनात चुकूनही येत नाही.

अवधूत परुळकर

भोंदू 'भगवान', भोळे भक्त!

– दिनेश गुणे

अंधश्रद्धा समाज विवेक

'त्यांच्या' चेहऱ्यावर एक निरागस बाल्य विलसत असते. डोळ्यांत मायेचा अपार सागर दडलेला दिसतो. त्यांनी हात उचलताच तेजस्वी प्रकाशकिरणांनी आसमंत उजळून निघाल्याचा भास होतो आणि त्यांच्या हास्यातून प्रेमाचे झरे ओसंडू लागतात. तोच विश्वाचा निर्माता, पालनकर्ता आणि संहारक आहे असे भासू लागते. त्याच्या चमत्कारांनी असंख्य आजार बरे होतात, त्याच्या कृपाप्रसादाने निपुत्रिकांना संतानप्राप्ती होते, निर्धनांना धनलाभ होतो. भौतिक समस्यांचे सारे डोंगर भुईसपाट होतात. त्याच्या दैवी शक्तीचा सर्वत्र बोलबाला सुरू होतो आणि संसारतापाने पोळलेल्यांची त्यांच्या दारी मुक्तीसाठी रीघ लागते. त्यांचा एक कृपाकटाक्ष व्हावा, यासाठी ताटकळण्याचीही त्यांची तयारी असते. त्यांचा सहवास लाभला, मस्तकावर त्यांचा हस्तस्पर्श फिरला, प्रसादाचा लाभ झाला, की भौतिक जगातील सारी दु:खे जणू झटक्यात दूर होऊन जातात आणि स्वर्गीय सुखाच्या अनुभूतीने मन आत्मानंदी रंगू लागते. या अनुभूतीचे दाखले इतरांनाही दिले जातात आणि समस्यामुक्तीच्या शोधात भरकटणारे हजारो आत्मे बाबांच्या चरणी लीन होतात. आपल्याजवळ असलेले सारे काही बाबांच्या पायाशी ओतण्याची त्यांची तयारी असते. एकदा अशा समर्पणभावाने भारलेल्या भक्तांची फौज तयार झाली, की बाबांच्या आश्रमाभोवती नवनवे उपक्रमही सुरू होतात. एखादा बाबा रुग्णालय सुरू करतो, कुणी योगशिक्षणाचे वर्ग सुरू करतो. कुणी आयुर्वेदिक वनस्पतींची लागवड करतो आणि बाबांच्या समाजोपयोगी कामाने भक्तगण आणखीनच भारावून जातात.

अशा रीतीने, आधुनिक युगातील एक एक स्वयंप्रकाशी महापुरुषाचा उदय होऊ लागतो आणि भक्तसमुदायाच्या पाठिंब्यावर हा आधुनिक देव महान होऊ लागतो. त्याचा जन्म, जगणे हा जणू चमत्कार होऊन जातो. बाबाच्या आयुष्याला चमत्काराच्या कहाण्या चिकटू लागतात.

अशा बाबांचा आता सुळसुळाट झाला आहे. भक्तांच्या तिजोरीच्या चाव्या पायाशी खेळविणाऱ्या अनेक बाबांचे पितळ उघडे पडू लागले तरीही भक्तपरिवाराची त्यांच्यावरील श्रद्धा अभंगच आहे. 'भगवंतालाही आत्मक्लेश सहन करावे लागतात', असा भोंदू संदेश देत हे भुक्कड भगवंत आपल्या साम्राज्याचे दगड मजबूत ठेवण्यासाठी गजाआडूनही धडपडताना दिसताहेत. देवत्वाचा शिक्का कपाळावर मिरवत पशूलाही लाजविणारी कृत्ये करणारे हे बाबा असतात तरी कोण? महापुरुष, माफिया, लिंगपिसाट, देव, की देवदूत? ही सारी रूपे बेमालूमपणे वठवत, 'आपण केवळ निमित्तमात्र' असल्याचा आव आणणाऱ्या या भोंदूबाबांची साम्राज्ये उघडउघड उभी राहात असताना, त्यांच्या कारनाम्यांचा साधा सुगावादेखील सरकारी यंत्रणांना का लागत नाही? किंबहुना, सरकारी यंत्रणांमधील उच्चपदस्थांची मांदियाळीच अशा बाबांच्या चरणाशी लीन होऊन कृपायाचना करताना का दिसू लागते? अशी कोणती शक्ती या बाबा-बुवांच्या अंगी असते, जिच्यापुढे साऱ्या यंत्रणा ढिल्या पडू लागतात?

याचे सरळ उत्तर एकच आहे. ते म्हणजे, ज्या बाबा-बुवाच्या मठ-आश्रमांच्या दारी भाविकांची अखंड वारी, तो बाबा महान. त्याची कीर्ती पसरू लागते आणि त्याच्या चरणाशी साऱ्या यंत्रणाही लोळण घेऊ लागतात, कारण त्याला दुखावणे म्हणजे त्याच्या असंख्य अनुयायांच्या भावनांना थेट हात घालणे, त्यांची नाराजी ओढवून घेणे. असे केले, तर बाबा-बुवांचा रोष ओढवणार आणि त्यांची अवकृपा झाली, तर त्यांचे असंख्य भक्तदेखील दूर होणार. त्याचा थेट परिणाम मतपेटीवरच होणार, या साध्या गणितापायी बाबा-बुवांची साम्राज्ये सुखाने फोफावत चालली आहेत.

हरियाणातील हिसार जिल्हय़ातील बाबा रामपाल नावाच्या स्वयंघोषित भोंदूला अटक झाली आणि अशा कथित महापुरुषांनी व्यवस्थेला केवढा जबरदस्त विळखा घातला आहे, त्याचे वास्तव पुन्हा उजेडात आले. सरकारी नोकरीत कनिष्ठ अभियंता असलेल्या या रामपालबाबाला आपण कबीराचा अवतार असल्याचा साक्षात्कार झाला आणि नोकरी सोडून १९९९

मध्ये त्याने सतलोक आश्रमाची स्थापना केली. तेव्हापासून त्याच्याभोवती गूढ वलय दाटत गेले. आज १२ एकरांवरील त्याच्या पंचतारांकित आश्रमात एक लाख लोक महिनाभर जेवण करू शकतील एवढा धान्यसाठा सापडला आहे. त्याच्या आलिशान आश्रमात सापडलेल्या गर्भनिरोधकांचे गूढ उकलण्यात आता तपास यंत्रणा कामाला लागली आहे. हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, पंजाब आणि दिल्लीत सुमारे २५लाख लोक त्याच्या भजनी लागले असावेत, असा अंदाज आहे. भजनी लागलेल्या भाविकांच्या भाबडेपणाचा फायदा उठवत स्वत:च्या लैंगिक विकृतीचे उदात्तीकरण हा अनेक बाबांच्या धंद्याचा मूलमंत्र असल्याचे काही प्रकरणांत दिसून आले आहे. तरीही रामपालबाबावरील कारवाईच्या वेळी हजारो लोकांनी त्याच्याभोवती संरक्षक कवच उभे करून प्रतिकार केला. हे त्याचे भक्त होते, की बंदिवान होते, याची चर्चा आता नव्याने सुरू झाली आहे.

पुण्यसंचयासाठी ज्याच्या दारी हजारोंची रीघ लागते, तो बलात्कारी असतो, बालकांवरील लैंगिक अत्याचाराचा डाग त्याच्या कपाळावर दडलेला असतो, महिलांच्या लैंगिक शोषणाचे आणि हत्या, अपहरणासारख्या गुन्हय़ांचा ठपकाही त्याच्या स्वयंघोषित दैवी आयुष्याला लगडलेला असतो. रामपालला अटक झाली, त्याच्या काही महिने अगोदर, आसाराम बापू नावाच्या एका स्वयंघोषित आध्यात्मिक बाबाला गजाआड जावे लागले. त्याच्या 'कृष्ण'लीला उजेडात येऊनही, त्याच्या भजनी लागलेल्या भक्तांसाठी आसाराम हा कृष्णावतारच आहे. लैंगिकतेचा खुला पुरस्कार हेच जणू त्याचे अवतारकार्य होते. एका १५ वर्षांच्या बालिकेवरील बलात्कार प्रकरणातून आसारामाच्या लीला उजेडात आल्या आणि तो गजाआड गेला. त्याआधी त्याच्या गुजरातमधील आश्रमातील दोन मुलांचे कुजलेले मृतदेह साबरमतीच्या तीरावर आढळले होते. या गूढ मृत्यूमुळे आसाराम भोवतीचे संशयाचे ढग गडद झालेच होते. तरीही, आसाराम हा असामान्य संत असल्याचा डांगोरा त्याचे भक्तगण पिटतच आहेत. देशभरात जवळपास सव्वाचारशे आश्रम आणि ५० हून अधिक गुरुकुल शाळांचा पसारा असलेल्या आसारामबापूवर आणि त्याच्या मुलावर संपत्ती आणि मालमत्ता हडप केल्याचाही आरोप आहे.

आसारामसारखाच एक स्वयंघोषित अवतार कर्नाटकातील बंगलोरजवळील बिदादी येथे उदयाला आला होता. स्वत:ला स्वामी नित्यानंद म्हणविणारा हा भोंदू २०१० मध्ये एका स्थानिक टीव्ही वाहिनीवर एका तमीळ अभिनेत्रीसोबत नको त्या स्थितीत लोकांना दिसला आणि त्याचे कारनामे उजेडात येऊ लागले. आरती राव नावाची एक भारतीय वंशाची अमेरिकन महिला त्याच्या जाळ्यात फसली होती. तिने त्याच्याविरुद्ध लैंगिक अत्याचाराचे जाहीर आरोपही केले होते. मात्र नित्यानंदने हे आरोपही फेटाळून लावले. तिच्या तक्रारीवरून नित्यानंदला अटक झाली; पण ५३ दिवसांनंतर तो बाहेरही आला. आपल्या 'भगवंतमुखा'तून निघणाऱ्या प्रवचनवाणीने भक्तांवर मोहिनी घालणाऱ्या या स्वामीला, 'माइंड बॉडी स्पिरिट' नावाच्या नियतकालिकाने 'जगातील सर्वात प्रभावशाली १०० आध्यात्मिक गुरूं'च्या मालिकेत बसवून गौरविले होते. २७ भाषांमध्ये ३०० पुस्तके लिहिणारा हा 'स्वामी' वास्तव जीवनात मात्र 'भिकार चाळे' करणाराच निघाला.

'आध्यात्मिक गुरू' म्हणवून घेणाऱ्यांच्या पंथातील ज्या काही बाबांनी राजकारणावरही आपल्या प्रभावाची मोहिनी घातली होती, त्यामध्ये बाबा रामदेव या योगगुरूचेही नाव घेतले जाते. योग प्रसारकार्य करणारा हा गुरू, राजकीय भाष्य करण्यातही नेहमी आघाडीवर असतो. देशविदेशात पसरलेल्या 'हाय प्रोफाइल' भक्तगणांचा मोठा परिवार पाठीशी असल्याने रामदेव बाबा हे राजकारणातील 'बडे प्रस्थ' ठरले असून अलीकडेच या संन्याशाला सरकारी 'झेड प्लस' सुरक्षा पुरविण्यात आली आहे. जून २०११ मध्ये दिल्लीतील रामलीला मैदानावरील त्यांचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन मोडून काढण्यासाठी पोलिसी फौजा दाखल होताच साडी नेसून बाबांनी पळ काढला होता, याची आठवण अजूनही अनेकांच्या मनात ताजी आहे. काळ्या पैशाच्या विरोधात उभ्या ठाकलेल्या रामदेव बाबांनी करचुकवेगिरी केल्याचा, शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्याचा आणि वीजचोरी केल्याचा आरोप 'तहलका' या नियतकालिकाने केल्यानंतर रामदेव बाबांच्या व्यवहारांभोवती गूढ वलय निर्माण झाले. रामदेव बाबांच्या ट्रस्टमार्फत चालविल्या जाणाऱ्या दिव्य फार्मसी' या औषध कंपनीतील उत्पादनांमध्ये मानवी आणि प्राण्यांच्या हाडांचा वापर केला जात असल्याचा आरोप करून माकपच्या वृंदा करात यांनी खळबळ माजविली होती.

बाबा रामपालचे अनुयायी आणि आर्य समाजचे कार्यकर्ते यांच्यातील संघर्षांतूनच रामपालचे कारनामे उघड होत गेले. याच आर्य समाजचे एक विचारवंत नेते म्हणून स्वामी अग्निवेश यांचा राजकारणातही प्रभावी उदय झाला. हरियाणातील आमदारकीपासून राजकीय कारकीर्द सुरू करणाऱ्या या स्वामींनी चित्रवाणीवर गाजलेल्या 'बिग बॉस'च्या घरातही काही दिवस घालविले होते. समाजसेवक अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात अण्णांच्या खांद्याला खांदा लावून उतरलेल्या या स्वामींचे पुढे काही बिनसले आणि त्यांनी अण्णा हजारे यांच्या आंदोलनापासूनच फारकत घेतली. हजारे यांच्यावर कारवाई करावी असे सरकारमधील एका वरिष्ठ व्यक्तीस सुचवितानाच्या त्यांच्या व्हिडीओमुळे ते वादाच्या भोवऱ्यात सापडले. हा व्हिडीओ बनावट असल्याचा बचाव अग्निवेश यांनी केला; पण त्यांना चौफेर टीका झेलावी लागली.

राजकारण्यांचे 'तांत्रिक गुरू' म्हणून ख्याती मिळविलेले चंद्रास्वामी हे एक गूढ व्यक्तिमत्त्व होते. आर्थिक गैरव्यवहारांचा शिक्का कपाळावर बसलेल्या चंद्रास्वामी यांचे अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांशी घनिष्ठ संबंध होते. परकी चलन कायद्याच्या भंगप्रकरणी त्यांना सुमारे नऊ कोटींचा दंड भरण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. लंडनमधील एका व्यावसायिकाच्या फसवणूक प्रकरणी त्यांना १९९६ मध्ये अटक झाली होती. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्या प्रकरणात चंद्रास्वामी यांच्याभोवती संशयाचे वलय निर्माण झाले होते. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या जैन आयोगाने आपल्या अहवालात चंद्रास्वामींवर काही पाने खर्ची घातली; पण अद्यापही त्यांच्या सहभागाबाबतचा कोणताच निश्चित निष्कर्ष निघू शकलेला नाही. या कटाच्या आर्थिक बाजूमध्ये त्यांचा सहभाग असल्याच्या संशयावरून तपास सुरूच आहे. माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्यापासून कुख्यात शस्त्रास्त्र तस्कर अदनान खशोगीपर्यंत अनेकांचे तांत्रिक गुरू म्हणून त्यांची ख्याती आहे. ब्रिटनच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांच्या पंतप्रधानपदाचे भाकीतही त्यांनी अगोदरच वर्तविले होते, असा गौप्यस्फोट काँग्रेस नेते नटवर सिंह यांनी केला आहे. मध्यंतरी काही काळ काहीसे मागे पडलेल्या चंद्रास्वामींचा दरबार आता पुन्हा सजू लागला असून अनेक पक्षांचे नेते आपली कुंडली घेऊन चंद्रास्वामींच्या दरबारात हजेरी लावत असल्याचे बोलले जाते.

पंजाबमध्ये १९४९ साली 'डेरा सच्चा सौदा' नावाच्या एका आध्यात्मिक संघटनेची स्थापना झाली. समाजसेवा आणि धर्मप्रसार या उद्दिष्टाने ही संघटना काम करते, असे सांगितले जाते. संघटनेचे सध्याचे प्रमुख गुरमीत राम रहिम सिंह यांना या पंथाचे अनुयायी ईश्वराचा अवतार मानतात. डोळे दिपविणारी सांपत्तिक स्थिती असलेल्या या धर्मगुरूने अवैध मार्गाने ३०० कोटींहून अधिक मालमत्ता जमविल्याचाही आरोप आहे. आसाराम बापूंवर बलात्काराचा आरोप झाल्यावर त्यांच्या बचावाकरिता धाव घेणाऱ्या संतावरही महिला अनुयायांच्या लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल आहे. मुंबईतील मुलुंड उपनगरातील गोळीबार प्रकरणानंतर डेरा सच्चा सौदा हे नाव मुंबईतही चर्चेत आले. राम रहिम सिंह यांच्या अनुयायांनी हा गोळीबार केल्याचा आरोप केला जातो. यामध्ये एकाचा मृत्यू झाला होता.

देशात बहुचर्चित असलेल्या आधुनिक संतांच्या मांदियाळीत श्री श्री रविशंकर यांचे नाव अग्रक्रमावर आहे. 'आर्ट ऑफ लिव्हिंग'– म्हणजे जगण्याची नवी शैली शिकविणारे श्री श्री रविशंकर 'योगी' म्हणविले जात असले तरी प्रत्यक्षात त्यांचा उल्लेख 'श्रीमान योगी' असाच करावा लागेल.५०० कोटींहून अधिक संपत्तीचा मालक असलेला हा गुरू, जनतेला जगण्याची कला शिकवितो. पौराणिक कथाकथन करून धर्मभावाचा प्रसार करणारे मोरारी बापू यांच्याकडेही ३०० कोटींहून अधिक संपत्ती असल्याचे बोलले जाते. ही सारी संपत्ती दानाच्या स्वरूपात प्राप्त झाल्याचे सांगण्यात येते.

माणसाच्या अंगी दैवी शक्ती कुठून येते? आपल्या भक्तांची मती हा मानवी भगवान चमत्काराने कशी गुंग करून टाकतो? असे चमत्कार खरेच शक्य असतात का? अशा प्रश्नांवर वादविवाद होत असले, तरी पुट्टापर्थीचे सत्य साईबाबा हे साक्षात साई अवतार आहेत आणि त्यांना कोणतीही गोष्ट अशक्य नाही, अशी त्यांच्या भक्तांची श्रद्धा आहे. सत्य साईबाबा यांच्या आश्रमावरही अशीच श्रीमंतीची झळाळी दाटलेली दिसते. ते हयात असतानाच्या त्यांच्या चमत्कारांच्या अनेक कथा अजूनही रंगवून वर्णन केल्या जातात. राजकीय वर्तुळातील अनेक बडय़ा नेत्यांचे गुरू असलेले सत्य साईबाबा यांच्या राजकीय गुरूचे रूप माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री शंकरराव चव्हाण यांनी केलेल्या पाद्यपूजा सोहळ्यामुळे महाराष्ट्राला अनुभवता आले. सत्य साईबाबांच्या

निधनानंतर त्यांच्या आश्रमातील संपत्तीची मोजदाद करताना अनुयायी थकून गेले होते, असे सांगतात. सत्य साई ट्रस्टची मालमत्ता ४० हजार कोटींच्या घरात असावी, असा अंदाज वर्तविला जातो.

धर्म हा भारतीय जनजीवनाचा अविभाज्य हिस्सा आहे. जनतेच्या धार्मिक भावनांचे आणि अंधश्रद्धांचे भांडवल करून अनेक बाबा-बुवांनी आपापली दुकाने थाटली आणि गोळा केलेल्या मायेच्या जोरावर राजकारणापासून अन्य अनेक क्षेत्रांवर आपली हुकमतही गाजवली. धर्म आणि अध्यात्माच्या नावावर, ईश्वराचे नाव घेत जनतेची फसवणूक करणाऱ्या बाबा-बुवांनी आध्यात्मिक क्षेत्र आणि श्रद्धाळू जनतेचे जगणेही गढूळ करून टाकले. केवळ संपत्तीच्या जोरावर बसविलेले बस्तान आणि जनतेच्या श्रद्धांचे भांडवल करून थाटलेल्या साम्राज्याच्या तेजाने राजकारणही दिपून गेले आहे. जनजीवन सुरळीत चालण्यासाठी अनेक बाबी आवश्यक असतात. या बाबींची घडी बसावी आणि दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी काम करणाऱ्या व्यवस्थांना अधिकृतपणा असतो. आजकालच्या बाबा-बुवांच्या व्यवस्थेने मात्र जनजीवनात अनावश्यक आणि अनधिकृत लुडबुड सुरू केली असूनही, या व्यवस्थेला वेसण का घातली जात नाही, हा प्रश्नच आहे. उलट, वादाची वलये स्वत:भोवती मिरविणारे तथाकथित साधुसंत आणि बुवा-बाबा राजकारण्यांच्या मांडीला मांडी लावून बसलेले दिसतात आणि राजकारणी नेते त्यांच्यासमोर विनम्रतेने नतमस्तक होतात, तेव्हा खरे काय, याचा संभ्रम समाजात बळावतो. अनधिकृतपणे समाजव्यवस्थेत वावरणाऱ्या या शक्तीची योग्य ती घडी बसविण्याची वेळ आता आली आहे. रामपालबाबा प्रकरणानंतर हे स्पष्ट झाले आहे.

– लोकसत्ता'च्या सौजन्याने

dinesh.gune@expressindia.com

●●●

पुरुष: एक वाट चुकलेला मित्र

–अवधूत परळकर

स्त्रीवाद विवेक समाज

स्त्री मुक्ती चळवळ, स्त्रीवाद याकडे सुजाण पुरुष नेहमीच आपुलकीनं आणि मैत्रीपूर्ण नजरेनं पाहात आला आहे. पण असं मी म्हणालो, की माझ्या स्त्रीवादी मैत्रिणी म्हणतात आहे कोठे तो सुजाण पुरुष?

हा काय तुमच्या समोर उभा आहे, असं गंमतीत त्यांना सांगावसं वाटतं. पण त्यांचा हा प्रश्न हसण्यावारी नेण्यासारखा नाही, त्यामागे त्याचं अनुभवसिद्ध निरीक्षण आहे याची मला जाणीव आहे. सुजाण पुरुषांची संख्या अजाण पुरुषाच्या तुलनेनं कमी आहे हे त्यांना यातून सुचवायचं होतं हे उघड आहे. आणि त्याचं निरीक्षण चुकीचं आहे असं म्हणता येणार नाही. समाजात मोठा वर्ग अजाण असेल तर त्याच्या अजाणपणाला आपण हसणं, त्याची रेवडी उडवणं किंवा त्याच्यावर सातत्यानं टीका करत राहाणं हे मात्र सुजाणपणाचं लक्षण नाही.

मुस्लिम समाजात जो अप्रागतिकपणा आपल्याला जाणवत राहातो तो आपण समाजशास्त्रीय आणि आर्थिकदृष्टया समजून घेतो. त्या समाजात शिक्षणाचा अभाव असल्यानं हे घडतं, जसजसा ज्ञानप्रसार होईल तसतसा तो समाज प्रागतिक बनत जाईल असं समाज-कार्यकर्ते आणि सुधारक नेहमी म्हणत असतात. झोपडपट्टयातील गलिच्छ वातावरणाला केवळ दारिद्र्य हे कारण नसून त्या वर्गातलं आरोग्यविषयक अज्ञान हेही आहे हे आपण सर्वांनी मान्य केलं आहे. ग्रामीण भागातलं अंधश्रद्धांचं प्रस्थ हेही अज्ञानातून निर्माण झाल्याचं आपण बोलतो. जिथं जिथं अज्ञान दूर करण्याचे प्रयत्न झाले तिथं तिथं अंधश्रद्धा मोठया प्रमाणावर कमी झाल्याची उदाहरणंही सांगतो. गुन्हेगाराच्या गुन्ह्यामागील कारणं देखील आपण त्याच्या अशिक्षितपणात, त्याच्या संस्कारात शोधतो आणि त्याचं मानसिक पुनर्वसन घडवून आणायला धडपडतो. पुरुषांना आरोपी

किंवा गुन्हेगार ठरवताना मात्र स्त्रीवादी अशाप्रकारे वैज्ञानिक आणि समाजशास्त्रीय भूमिका घेताना दिसत नाहीत. हे असं का होतं?

स्त्रीवादी चळवळीतील एक मोठा वर्ग पुरुषांचा द्वेष करत आला आहे. पुरुषांविषयीच्या व्यक्तिगत कडवट अनुभवातून या स्त्रीवादी गटाची ही मानसिकता घडली असावी. दलित चळवळीतले कार्यकर्ते आणि स्त्रीवादी संघटनेतला हा अतिरेकी गट दोन्ही समाजाच्या एका समूहाबद्दल द्वेषमूलक मानसिकता घेऊन वावरताना दिसतात. ब्राह्मण समाजानं शंभर वर्षापूर्वी दलित वर्गावर भीषण अत्याचार केले; त्याला अत्यंत हीनपणे वागवलं म्हणून त्या वर्गातले बहुसंख्य नागरिक समाजातल्या आजच्या ब्राह्मणवर्गाविषयी सरसकट द्वेषभावना बाळगून आहेत. जातीय भावना न बाळगणारे ब्राह्मण त्यांना अवतीभोवती दिसत नसतील असं नाही पण ते त्यांचा अपवाद करत नाहीत. अगदी याच पद्धतीचं धोरण स्त्रीवादी अवतीभोवतीच्या पुरुषांबाबत अवलंबताना दिसतात. सरसकट पुरुषवर्गाकडे त्या द्वेषभावनेनं पाहाताना आढळतात. स्त्री चळवळीत अशा अतिरेकी स्त्रियांची संख्या दलितवर्गातल्या ब्राह्मणद्वेषी लोकांइतकीच आहे.

सुजाण पुरुष ही संकल्पनाच या स्त्रीवादी गटाला फँण्टसी वाटते. सुजाण पुरुषांचं प्रमाण समाजात कमी असलं तरी ते फँण्टसी वाटावं इतकं अस्तित्वहीन निश्चित नाही. या भावनेतून स्त्री-मुक्ती चळवळीला अकारण युद्धाचं रूप प्राप्त झालं आहे. या युद्धात स्त्री-पुरुष शत्रू म्हणून समोरासमोर उभे ठाकल्याचं चित्र निर्माण झालं आहे. स्त्रीमुक्ती चळवळीनं पुरुषांविरूद्ध रणशिंग फुंकल्याचा आभास काही स्त्रीवादी लेखिकांच्या लेखनातून, जाहीर भाषणातून आणि एकूण अभिनिवेशातून जाणवत राहातो.

चळवळीच्या प्राथमिक अवस्थेत लक्ष वेधून घेण्यासाठी अशा प्रकारची तंत्रं अवलंबण्याची गरज होती यात शंका नाही. पुरुषांच्या अनिष्ट वर्तनाकडे संपूर्ण समाजाचं, आणि खास करून स्त्री-वर्गाचं लक्ष वेधण्याची आवश्यकता होती. स्त्रीवर्गाच्या वाट्याला दुय्यम स्वरूपाचं जगणं आलं आहे ते पुरुषप्रधान संस्कृतीमुळे हा मुद्दा स्त्री चळवळीनं सुरवातीच्या काळात अधिक जोरकसपणे अधोरेखित केला. यातही आक्षेपार्ह किंवा चुकीचं काही नव्हतं. किंबहुना हे वास्तव भेदकपणे समाजापर्यंत पोचवायची गरज होती. चळवळीतल्या अतिरेकी गटानं याचा विपर्यास केला. चळवळ पुरुषसंस्कृतीप्रधान समाजरचनेच्या विरोधात होती, पुरुषांच्या विरोधात नव्हती. समाजरचनेतील पुरुषी वर्चस्व नष्ट व्हावं अशी चळवळीची मागणी होती.

पुरुषप्रधान संस्कृती नष्ट करून स्त्रीप्रधान संस्कृती स्थापन करावी असं उद्दिष्ट चळवळीतल्या नेत्यांसमोर कधीच नव्हतं. स्त्री-पुरुष दोघांच्याही भावभावना, स्वातंत्र्य आणि आशा आकांक्षांची बूज राखणारी समाजव्यवस्था या मागणीचा ही चळवळ सतत पुरस्कार करत आली आहे. समाजात विषमताशून्य न्याय व्यवस्था निर्माण होण्यासाठी हे आवश्यक असल्याचं स्त्री-मुक्ती चळवळीच्या प्रणेत्यांचं म्हणणं होतं. आजही चळवळीतल्या मुल्य विचारधारेचं धोरण हेच आहे. पुरुषप्रधान संस्कृती नष्ट होऊन समाजात उभयवर्गाला समानतेनं जोखणारी व्यवस्था आकाराला यावी यासाठी स्त्री-मुक्ती चळवळवाल्यांचा लढा आजही चालू आहे.

पण प्रत्येक चळवळीत जहाल गट आपल्या आक्रमकतेनं माध्यमांचं लक्ष अधिक वेधून घेतो. या जहाल गटाच्या अतिरेकी विधानांनी आणि व्यवहारांनी चळवळीविषयी अकारण गैरसमज पसरत जातात. उभय वर्गात एक दरी निर्माण होते. दोन्ही गट एकमेकांकडे वैरभावनेनं बघू लागतात.

वास्तविक स्त्री-मुक्तीचा लढा स्त्रीवर्गानं एकट्यानं लढायचा लढा नाही. ती स्त्री-पुरुषांनी संयुक्तपणे लढायचा हा लढा आहे. विषमतेविरूद्धचा दलितांचा लढा दलित एकटे लढत नाहीत. समाजातल्या मध्यमवर्गी सवर्ण बुद्धिमंतांची साथ या लढ्याला वेळोवेळी मिळत आली आहे. स्त्री-मुक्तीचा लढा देखील विषमताहीन समाज निर्माण करण्यासाठी लढला जात असल्यानं त्यालाही समाजातल्या मानवतावादी, शहाण्या आणि सहिष्णु, समंजस पुरुषांच्या साथीची गरज आहे. चळवळीच्या नेत्यांना याची जाणीव आहे. लढ्याची व्यापकता ओळखून स्त्री-चळवळीच्या काही वरिष्ठ नेत्यांनी विविध टप्प्यांवर आणि विविध पातळ्यांवर पुरुषवर्गाला सहभागी करून घेतलं आहे. स्त्रीवाद्यांमधल्या अतिरेकी गटानं या गोष्टीची जाणीव बाळगायला हवी.

विविध कला, वाचन लेखन, सामाजिक चळवळी यात रस घेणारा एक पुरुषवर्ग आहे. तो अल्पसंख्य असेल. पण स्त्री-स्वातंत्र्य, स्त्री-मुक्ती चळवळ यामागील संकल्पना त्याला तत्त्वत: मान्य आहे. थोडेफार मतभेद असले तर ते या संकल्पना व्यवहारात कशा उतरवायच्या यावर आहेत. या पद्धतीचे मतभेद स्त्रियांच्या हितासाठी काम करणाऱ्या संघटना दरम्यानही आहेत. या अल्पसंख्य पुरुषगटाचा चळवळीला थेट हातभार नाही. पण आवश्यक तेव्हा स्त्री-संघटना त्यांची मदत घेतात. काही जणांनी एकत्र येऊन स्त्री चळवळीला पूरक असं कार्य करणाऱ्या पुरुष संघटनाही स्थापन केल्या आहेत. पुरुषांचा हा गट स्त्री संघटनांना वेळोवेळी साहाय्य करण्यासाठी पुढं सरसावतो. विशेष म्हणजे तेवढयावर समाधान न मानता स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वतंत्ररित्या कामही करतो.

स्त्रियांचं समाजातलं एकूण योगदान ज्यांना ठाऊक आहे ते पुरुष चळवळीतल्या स्त्रियांकडे स्नेहपूर्ण भावनेनं आणि कौतुकानं पाहात आले आहेत. ही मैत्रीपूर्ण भावना महत्त्वाची आहे. स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या चळवळीत आणि आंदोलनात हा मैत्रीभाव अनेकदृष्ट्या उपयोगी पडणारा आहे. पुरुषांचा एक गट अशा प्रकारच्या सहकार्याच्या भावनेनं स्त्रियांकडे, त्यांच्या चळवळींकडे पाहातो आहे हे वास्तव लक्षात घेतलं पाहिजे.

स्त्री-मुक्तीची चळवळही आज एका लहानशा वर्तुळात सीमित आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. समाजाच्या मुख्य प्रवाहात या चळवळीचं म्हणावं तसं प्रतिबिंब पडलेलं नाही. ग्रामीण भागातली निरक्षर स्त्री आज पुरुषी व्यवस्थेला आवाज देत असलेली काही प्रमाणात तरी आढळते. शहरी भागात सगळा आनंद आहे. आज महाराष्ट्रातली मध्यमवर्गी स्त्री, तिच्या जाणीवा, तिच्या आवडीनिवडी, तिची मानसिकता जाणून घ्यायची असेल तर टीव्हीवरला होम मिनिस्टर कार्यक्रम पाहावा. महाराष्ट्रीय स्त्रीची खरोखरीची प्रतिमा या कार्यक्रमातल्या स्त्रियांच्या बोलण्यावागण्यातून, पोशाखातून यथार्थपणे उभी राहाते.

हारून-अल-रशीद ज्याप्रमाणे वेषांतर करून शहरात हिंडायचा आणि लोक पश्चात आपल्याविषयी काय बोलतात हे जाणून घ्यायचा. त्याप्रमाणे स्त्री-मुक्ती चळवळीच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आपले समाजसेवी गणवेष उतरवून सिल्कच्या झगमगीत साडया नेसून या समाजात मिसळलं पाहिजे; 'होम मिनिस्टर कार्यक्रमाच्या शूटींगला हजर राहिलं पाहिजे, मंगळागौर समारंभात सामील झालं पाहिजे. आपण कुठं आहोत आणि समाज कुठं याचं भान त्यांना या प्रयोगातून येईल. आपली चळवळ समाजात कुठवर पोहोचली आहे ते कळेल.

वास्तव फार निराशाजनक आहे. फार मोठा समाज स्त्री-मुक्ती आणि स्त्रियांच्या इतर चळवळींपासून आलिप्त आहे. यात पुरुष तर आहेतच पण स्त्रिया देखील मोठया सं'येनं आहेत. सर्वसाधारण पुरुषात स्त्रियांच्या चळवळींविषयी फार चित्रविचित्र समज आहेत. चळवळी संदर्भात पुरुषवर्गात सरसकटपणे ऐकायला येणाऱ्या प्रतिक्रिया कशा आहेत तर . .

'ही स्त्रियांनी स्त्रियांसाठी चालवलेली चळवळ आहे. त्यांचं काय ते त्या बघून घेतील. आपल्याला या भानगडीत पडायचं कारण नाही.'

'ज्यांना कामधंदा नाही त्या स्त्रिया अशा चळवळी चालवताहेत.'

'या मंडळींचे संसार मोडले आहेत त्या आता दुसऱ्यांच्या संसारात विष कालवू पाहताहेत.'

'टाळी एका हातानं वाजत नाही. स्त्रियाही स्वार्थी असतात. त्याही नवऱ्यावर आणि कुटुंबातल्या इतरांवर अत्याचार करतात. स्त्री-मुक्तीवाल्यांना फक्त स्त्रियांवरले अत्याचार दिसतात.'

'असमानता ही निसर्गातच आहे. निसर्गानंच स्त्रियांवर काही जबाबदाऱ्या टाकल्या आहेत. तुम्ही निसर्गाच्या विरूद्ध जाल तर त्याचे परिणाम भोगावे लागतील.'

पुरुषांच्या या अज्ञानमूलक विधानांना घरातल्या सर्वसाधारण स्त्रीवर्गाचा दुजोरा असतो. रूढी, परंपरा आणि पुरुषी वर्चस्वातून निर्माण झालेली मानसिकता यातून त्यांची जडणघडण झाल्यानं त्याही अंधपणे पुरुषांनी निर्माण केलेली विचार

संस्कृती स्वीकारतात. पुरुषांची द्वेषमूलक भूमिका अज्ञानातून जन्माला आली आहे हे ज्यांना मान्य आहे त्यांनी पुरुषांवर दोषारोप करण्यात वेळ न गमावता अज्ञानाचा हा अंधकार कसा हटवता येईल हे पाहिलं पाहिजे. स्त्रियांना शिक्षित करण्यावर आजवर स्त्री चळवळींचा भर राहिला आहे, आता पुरुषांना शिक्षित करण्याचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. मैत्रीभावनेची गरज इथंच भासते. शिक्षणाच्या प्रभावी प्रसारासाठी शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात मैत्रीचं नातं असण्याची गरज आहे, असा विचार आता पुढं येऊ लागला आहे. आणि इथंच मोठा पेच आहे.

स्त्री-पुरुषात लग्नं होत असली, प्रेमं घडत असली तरी मैत्रीचा चांगलाच अभाव आहे. पती-पत्नीत दीर्घ सान्निध्य आहे; व्यावहारिक जवळीक आहे पण मैत्रीचं नातं नाही अशाही चमत्कारिक गोष्टी आता लक्षात येऊ लागल्या आहेत.

स्त्री-वर्गाविषयी असलेल्या गैरसमजांना वास्तवाचा आधार नाही; अशाप्रकारे गैरसमज बाळगणं हे अंतिमतः आपल्याच हिताच्या आड येणारे आहे हे जेव्हा पुरुषांना समजेल; स्त्री-हिताच्या चळवळी मूलत: मानवहिताच्या मानवतावादी चळवळी आहेत हे जेव्हा त्यांना पटेल तेव्हा स्त्री चळवळीत पुरुषांचा मोठा गट सामील होईल. आपण एकट्यानं हे जग बदलू हा अभिनिवेश चळवळीतल्या ज्या स्त्रियांपाशी आहे त्यांना कदाचित हे निरीक्षण कदाचित पटणार नाही.

तू मुँह खोलेगी तो जमाना बदलेगा...या सारखी विधानं स्त्रीवर्गात जागृती आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी ठीक आहेत. पण चळवळीला पुढं नेण्यासाठी या रोमँटिक अवस्थेतून स्त्री नेतृत्वाला बाहेर यावं लागेल. वीरश्री निर्माण करण्यासाठी देशभक्तीपर गीतांचा उपयोग होत असेल. पण लढाई जिंकण्यासाठी ती उपयोगी पडत नाहीत हे सर्वांना ठाऊक आहे. आज स्त्री-मुक्ती, स्त्री-समस्या यावर अनेक स्त्रिया आपापल्या परीनं अनेक ठिकाणी लिहिताहेत. स्त्री समस्यांना, स्त्री विचारांना वाहिलेली मासिकं, साप्ताहिकं आहेत. विभावरी शिरूरकरांपासून ते गौरी देशपांडे, सानिया, मेघना पेठे, मंगला आठलेकर, अंबिका सरकार, सुकन्या आगाशे, कविता महाजन यासार'या कितीतरी लेखिका आहेत, ज्यांनी अत्यंत समर्थपणे आपल्या कथा-कादंबऱ्यातून स्त्री-प्रश्नांची सर्जनशील मांडणी केली आहे. थोडक्यात: स्त्रियांनी तोंडं उघडली आहेत, लेखण्याही सरसावल्या आहेत. पण वाचतो कोण?

स्त्रियांनी तोंड उघडलं तरी तिची वेदना ऐकू येण्यासाठी समाजापाशी संवेदनशील कान हवेत; तिच्या मानसिकता जाणण्याची इच्छा असणारं मन हवं. मोजके अपवाद वगळता पुरुषवर्गात या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे. कायदा करून, वटहुकूम काढून पुरुषवर्गात या गोष्टी निर्माण करता येतील का?

समंजसपणा निर्माण करण्याचं काम समंजसपणेच करावं लागेल. पुरुषाशी मित्रत्वाचं नातं जोडणं हाच त्यावर उपाय दिसतो. पुरुषांविरूद्ध तलवारी उपसून, -'हल्ला बोल चे नारे देऊन, सर्वंकष बंडाची भाषा उच्चारून दहशत निर्माण करता येईल, समाजाचं (आजच्या काळात प्रसार माध्यमांचं) लक्ष वेधून घेता येईल. पण त्यानं पुरुष प्रबोधनाचा हेतू साध्य होईल का? स्त्रियांमधल्या जहाल गटांनी आणि त्यामागे फरफटत जाणाऱ्या इतर स्त्री संघटनांनी याचा विचार करावा.

काचोळ्या जाळून स्त्रीवादी संघटनांनी आपल्या चळवळीची सुरवात नाट्यपूर्ण केली. त्यावेळी अशा धक्कादायक कृतीची गरजही होती. आज पस्तीस वर्षांनंतर खूप काही बदललं आहे. पुरुष मानसिकतेत मात्र म्हणावा तसा फरक पडलेला नाही. स्त्री-समस्यांविषयी पुरुष-समाज अजून बेफिकीर आहे. यात वैज्ञानिक, तंत्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, राजकीय विश्लेषक, समीक्षक अशा सगळ्या उच्च विद्याभूषितांचा समावेश आहे. स्त्रिया आणि स्त्री-चळवळी यांच्याविषयी या मंडळींचे दृष्टिकोन धक्कादायक आहेत. शिक्षण माणसांना विशिष्ट विषयाचा तज्ज्ञ बनवतं, सर्वज्ञ बनवत नाही आणि सुशिक्षित, आदर्श मानवही बनवत नाही. परस्पर आदरभावना, मानवतावादी मूल्याविषयी आस्था, संवेदनशीलता यांच्याशी आजच्या शिक्षणाचा काही संबंध उरलेला नाही.

या बुद्धीकुशल पुरुष जमातीला एका कविनं आपल्या एका कवितेत सुनावलं आहे. तो म्हणतो:

कशासाठी हे लोलक लावताय आकाशात दूरवर पाहण्यासाठी?

साध्या जवळच्या बायका न त्यांची मनं पाहू शकत नाही तुम्ही.

आपल्या आसपास काय आहे, पायाखाली काय आहे हे पाहायचंच नाही असं ठरवलेली ही परंपरावादी पुरुष मंडळीं. शालेय मुलांना नव्हे तर त्यांच्या या बुद्धिमंत पालकांना मूल्यशिक्षण देण्याची आज गरज आहे. स्त्रियांना सक्षम करण्याविषयी बरंच बोललं जातं. ते ठीकच आहे. पण पुरुष सक्षम असल्याचं आपण कोणत्या आधारे गृहीत धरलं आहे हे कळायला मार्ग नाही. स्त्रीवादी संघटनांनी आता या कामाला प्राधान्य दिलं पाहिजे.

पुरुष मानसिकतेवर दोषारोप करत राहिल्यानं काही साध्य होईल असं वाटत नाही. या मानसिकतेमागील समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय कारणं सोधून काढण्याचे प्रयत्न स्त्रियांना करावे लागतील. पुरुषांचं वैज्ञानिक रसायन अभ्यासावं लागेल. मानवी उत्क्रांती-विज्ञानात यासाठी उतरावं लागेल. जेनेटिक्सच्या अंगानंही पुरुष जडणघडणीचा वेध घ्यावा लागेल. पूर्वग्रहदूषित दृष्टी या कामाला उपयोगी नाही. संशोधकाच्या निष्ठेनं हे काम करावं लागेल. स्त्री-पुरुष दोन्ही घटकांनी संयुक्तपणे हाती घ्यायचा हा उपक्रम आहे. खरं तर स्त्रियांचे सर्व लढे स्त्री-पुरुषांनी एकत्र लढण्याची वेळ आज आली आहे.

तुम्ही आलात तर ठीक नाही आलात तर आम्ही एकट्या लढू असे हट्टी आवेशपूर्ण धोरण इथं उपयोगाचं नाही. अधिकाधिक पुरुष या चळवळीमागे उभे राहतील तर ते उभयतांच्याच फायद्याचे आहे. चळवळीतल्या स्त्रियांना पुरुषांबरोबरच्या व्यवहाराचा कटू अनुभव आहे कबूल; पण व्यक्तिगत अनुभवाचा राग त्यांनी तमाम पुरुष जातीवर काढू नये.

सगळे पुरुष अमानुष आहेत अशी स्थिती खरोखर आहे काय? आणि जे कोणी अमानुष वर्तन करताहेत, त्यांच्यापैकी बऱ्याचजणांना आपण अमानुष वागत आहोत याची जाण तरी आहे का? अमानुषतेची बीजं पुरुष प्रधान संस्कृतीत आहेत हे खरं मानलं तरी ही संस्कृती नावाची गोष्ट आजच्या एकट्यादुकट्या पुरुषानं निर्माण केलेली नाही. परंपरेनं ती समाजावर लादली आहे. आणि माणूस परंपरेचा गुलाम असतो. पण हे तरी खरं आहे का? कालबाह्य आणि वाईट परंपरा समाजानं वेळोवेळी धुडकावून लावल्याचं इतिहास सांगतो. आहेत. मग पुरुषप्रधान संस्कृतीची परंपरा पुरुषानं धुडकावून का नाही लावली असा प्रश्न निर्माण होतो.

याचं उत्तर माणसाच्या स्वार्थी आणि स्वकेंद्रित वृत्तीत सापडेल. ज्या परंपरांमुळे पुरुष जमातीला सोयी-सुविधा आणि वरचढपणा प्राप्त झाला आहे त्या टिकवण्याकडे तिचा कल असणारच. आज स्त्रीवादी चळवळीत समाजशास्त्र, संस्कृती, मानववंशशास्त्र याचा अभ्यास असलेल्या विदूषी आहेत. पुरुषी वर्चस्वाच्या या नैसर्गिक कारणमीमांसेवर त्यांनी विचार केला नसेल असं नाही. पण त्यांच्या लढ्यात, पुरुषवर्गाविषयीच्या सर्वसाधारण धोरणात त्याची छाया दिसून येत नाही. स्वार्थाचाच एक भाग म्हणून स्त्रीवादी चळवळीमागे उभं राहिलं पाहिजे हे त्या पुरुषवर्गाला नीटपणे पटवू शकलेल्या नाहीत.

स्त्री चळवळीचा उद्देश केवळ कुटुंबात नव्हे तर संपूर्ण समाजात निर्भय आणि निकोप वातावरण निर्माण करायचा आहे हेच अनेक पुरुषांना (आणि स्त्रियांना देखील) आज ठाऊक नाही. चळवळीबद्दलचे गैरसमज दोन्ही वर्गात आहेत. परस्पर स्नेहाचं वातावरण निर्माण झाल्याशिवाय ते दूर होणार नाहीत. स्त्रिया आणि समाजातले शहाणे पुरुष यांच्यावर ही जबाबदारी येऊन पडते. हळूहळू इतर पुरुष त्यांना साथ द्यायला पुढं सरसावतील; स्त्री-पुरुष समतेचा विचार समाजात पसरवू लागतील. समाजातल्या मुख्य-प्रवाहातील स्त्री-पुरुष सहभागी झाल्याशिवाय या कामाला वेग येणार नाही.

स्त्री-जागृतीच्या कार्यात आघाडीवर असलेल्या 'मिळून साऱ्याजणी या मासिकात सुनंदा कर्नाड यांचं एक पत्र प्रसिद्ध झालं आहे. त्यात त्या म्हणतात, घरात बायकोला तुच्छतेनं वागवणारा माझ्या पुण्यातील मैत्रिणीचा नवरा मला कैकेयी म्हणतो, कारण मी कान फुंकल्यामुळे ती आज नवऱ्याचा माज उतरवण्याइतकी धीट झालीय आणि स्वतंत्रपणे आपला निर्णय घेते. कान फुंकल्यामुळे असा बदल घडून येत असेल तर कान फुंकण्याचं हे काम लाज शरम न बाळगता मोठया प्रमाणावर हाती घेतलं

पाहिजे. आणि केवळ स्त्रीनं स्त्रीचे कान फुंकण्यापुरती ही मोहीम मर्यादित ठेवून चालणार नाही. स्त्रीनं आपल्या पुरुष मित्राचे आणि त्या मित्रानंही त्याच्या मैत्रिणीचे कान फुंकायला हवेत.

पत्रातल्या पुरुषाची प्रतिक्रिया आज पुरुष कोठे आहेत हे सूचित करणारी आहे. पुरुषाला प्रबोधन करणाऱ्या नियतकालिकांची किती निकड आहे हे यावरून स्पष्ट व्हावं. मात्र परस्परांविषयी आकस न बाळगता हसतखेळत हे प्रबोधन व्हायला हवं.

उभयतांनी शत्रूत्वाच्या भावनेला तिलांजली देणं ही आजची खरी गरज आहे. चळवळीचा पुढील प्रवास सुकर होण्यासाठी हे लवकरात लवकर घडून येणं आवश्यक आहे. तुच्छता, द्वेष, मत्सर, आकस यांनी मानवापुढील कोणतेच प्रश्न सुटलेले नाहीत. स्त्री-पुरुषांना संघर्ष करायचा आहे तो स्वत:च्याच सनातन वृत्ती-प्रवृत्तींशी. चळवळी वरकरणी स्त्रियांच्या असल्या तरी त्या स्त्री-पुरुषांनी संयुक्तपणे चालवण्यावर भर देणं हे स्त्री-मुक्ती चळवळीचं पुढलं पाऊल का असू नये?

मित्रत्वाची साद म्हणून स्त्री संघटनांनी पुरुष कार्यकर्त्यांना आपल्या संघटनात ३३ टक्के आरक्षण द्यावं. आज जे शहाणे पुरुष चळवळीला बाहेरून पाठिंबा देत आहेत. ते संघटना कार्यात सहभागी झाले तर चळवळीला लाभदायकच ठरणार नाही का? स्त्री संघटनांनी स्त्रियांची चळवळ स्त्रियांची मानू नये ती संपूर्ण समाजाची मानावी. पुरुषांची साथ घेण्यात आपला पराभव मानू नये. हे अपयश नसून स्त्री चळवळीचा हा नवा अध्याय मानावा. सोशल इंजिनिअरिंगचा भाग म्हणून मायावतीनं ब्राह्मण समाजाला राजकीय आघाडीत सामावून घेतलं. यामागे मायावतीचं धूर्त राजकारण असेल. पण सैद्धांतिक पातळीवर तो एक चांगला प्रयोग होता हे मान्य करायला हरकत नाही. तेव्हा प्रयोग म्हणून तरी स्त्री वर्गानं आपल्या सामाजिक चळवळीत समविचारी पुरुषांना सहभागी करून घ्यावं.

'दूरके कॉरले निकट बाँन्धू पॉरके कॉरले भाई असं रवींद्रनाथांनी गीतांजलीत ईश्वराला उद्देशून म्हटलंय. आपण स्त्री-चळवळीतल्या आपल्या कार्यकर्त्या मैत्रिणींना या धर्तीचं आवाहन करूया. त्यांनी विचारानं दूर असलेल्या पुरुषांशी वैचारिक जवळीक साधावी. समविचारी नसणाऱ्यांना विश्वासात घेऊन समविचारी बनवायचा प्रयत्न करावा. समोरच्या पुरुषांकडे शत्रू म्हणून न पाहता मित्र म्हणून पाहावं. वाटल्यास त्यांनी त्याला वाट चुकलेला मित्र म्हणावं. अर्थात स्त्रियांच्या या मैत्रीपूर्ण हाकेला प्रतिसाद देण्यासाठी पुरुषाकडे किमान सुजाणपण हवं.

इथं स्त्रीवादी कार्यकर्तीनं सुरवातीला विचारलेल्या प्रश्नाची आठवण होते. 'सुजाण पुरुष आहे तरी कुठे?

असा पुरुष खरोखरच आसमंतात नसेल तर स्त्रियांना तो निर्माण करावा लागेल. म्हणजे आजच्या स्त्रीवर दुहेरी जबाबदारी आहे. तिला पुरुषाला आपला मित्र बनवायचा आहे आणि त्याला सुजाणही करायचं आहे.

'ऐसी अक्षरे', दिवाळी अंक २०१४ सौजन्याने

awdhooot@gmail.com

●●●

सांस्कृतिक राष्ट्रवादाची दुधारी तलवार

-मिलिंद मुरुगकर

इतिहास विकास धर्म

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर आहेत. इतक्या उंच, की त्यांच्या जवळपासदेखील आज कोणताही भारतीय नेता नाही आणि यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. कमालीचा आत्मविश्वास, जनतेशी थेट संवाद साधण्याचे कौशल्य आणि लोकांमध्ये आश्वासकता जागवण्याचे सामर्थ्य या गोष्टी लोकप्रियतेचा पाया आहेत. या अफाट

लोकप्रियतेमध्ये प्रचंड आशादायी घडण्याची क्षमता अर्थातच आहे; पण या लोकप्रियतेचा एक तोटादेखील आहे. तो असा की, माध्यमे पंतप्रधानांकडून घडणाऱ्या चुकांबाबत अतिउदार वागू शकतात. विशेषत: या चुका उघड उघड राजकीय स्वरूपाच्या नसतील, तर ही शक्यता जास्तच असते. अलीकडेच असे एक उदाहरण महाराष्ट्रात घडले. अंबानी उद्योगसमूहाने बांधलेल्या रुग्णालयाचे उद्घाटन करताना पंतप्रधान बोलत होते. श्रोत्यांमध्ये अर्थातच डॉक्टरांची संख्या मोठी होती. पंतप्रधान म्हणाले– 'पुरातन भारतीय वैद्यकशास्त्र किती प्रगत होते याचे दोन मोठे पुरावे म्हणजे गणपती आणि कर्ण. माणसाच्या शरीराला हत्तीचे तोंड लावता येण्याची क्षमता त्या काळच्या वैद्यकशास्त्रात होती, याचा गणपती हा पुरावा आहे. पुरातन काळी प्लास्टिक सर्जरीचे तंत्रज्ञान आजच्यापेक्षा किती प्रगत होते याचाच हा पुरावा.' कर्णाचेही तसेच. पंतप्रधान म्हणाले की, 'महाभारतात आपण वाचतो की, कर्ण हा त्याच्या आईच्या पोटी जन्माला आला नाही. याचाच अर्थ त्या वेळी जनुकशास्त्र एवढे प्रगत झाले होते.' अशा तऱ्हेची विधाने अर्थातच इतरांकडून नेहमीच केली जातात. आजचे अनेक शोध आपल्या पूर्वजांनी आधीच कसे लावलेले आहेत, असे अनेक जण अभिमानाने सांगतात. बऱ्याचदा त्यातील तर्कविसंगती स्पष्ट असते.

अशा विधानांतील एक मुख्य विसंगती अशी की, आपल्या पूर्वजांनी एवढे मोठे शोध लावले, मग ते लिहून ठेवण्याचे तंत्रज्ञान कसे काय निर्माण केले नाही? मोदींच्या विधानांतील हास्यास्पदताही उघड आहे; पण इथे महत्त्वाचा मुद्दा तो नाही. कदाचित पंतप्रधानांचा हेतू, खोल आणि विधायक अर्थाने राजकीय असेल. त्यांना फक्त आपल्या तंत्रज्ञांचा आत्मविश्वास जागवायचा असेल. त्यांनाही आपले विधान तर्कावर टिकणारे नाही याची जाणीव असणार (अशी आशा करू या). त्यामुळे पंतप्रधानांच्या 'आत्मविश्वास' जागवणाऱ्या उद्देशाचीच आपण समीक्षा करू या.

कोणत्याही संस्कृतीमध्ये मिथकांना महत्त्व असते. आपल्या संस्कृतीत गणपती ही विद्येची देवता मानण्यात येते. गणपती हा प्रत्यक्षात अस्तित्वात होता की नाही, हा गैरलागू प्रश्न आहे; पण अशा मिथकांचे वैज्ञानिक स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न अनेकदा होतो. येथे ही मिथके माणसांची मानसिक गरज भागवतात हे विसरले जाते. तुळशीमुळे हवा शुद्ध होते किंवा तुळशीचे औषधी गुणधर्म आहेत, हे आधुनिक विज्ञानाच्या आधारेही म्हणता येते; परंतु अंगणात वा बाल्कनीत तुळशी वृंदावन ठेवण्यामागे या हेतूंपेक्षा अधिक भावनिकतेला महत्त्व असते. अंगणातील तुळस आपली खोलवरची मानसिक गरज भागवत असते. माझी पणजी तुळशीची पूजा करत होती, आजीही करत होती, आई देखील करत होती, म्हणून मलाही अंगणात तुळस असावीशी वाटते. कोणत्या तरी गोष्टींचे सातत्य असणे याचा मानसिक आधार माणसाला हवा असतो. त्यात आठवणी असतात, भावना असतात आणि काही जणांसाठी तो श्रद्धेचा विषय असतो. या वैयक्तिक भावनांत गैर काही नाही; पण त्याचे स्पष्टीकरण हे त्याला शास्त्रीय आधार देऊन देण्याचा प्रयत्न करणे हे आपल्या आत्मविश्वासाचे द्योतक नसते, तर ते आपल्या न्यूनगंडाचे द्योतक असते. पंतप्रधानांचा हेतू जरी भारतीयांचा आत्मविश्वास जागवण्याचा होता असे मानले तरी प्रत्यक्षात अत्यंत अतर्क्य आणि हास्यास्पद उदाहरणामुळे आपली अगतिकताच जगासमोर येते. उलट, आत्मविश्वास जागवण्यासाठी कुठकुठली साक्ष काढून दाखवण्याच्या प्रयत्नांमुळे आपल्या न्यूनगंडालाच बळकटी मिळते, कारण आपण ओढूनताणून काही तरी सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो आहोत याची आपल्याला जाणीव असतेच.

गणपतीच्या अस्तित्वाला वैधानिक आधार देण्याचा प्रयत्न गणपतीचे मिथकत्व, देवत्वच संपवतो. येथे संघर्ष श्रद्धा आणि विवेक यांच्यातील नसतो. श्रद्धेवर विवेक मात करत नाही. श्रद्धेवर न्यूनगंड मात करतो. या न्यूनगंडाचे मूळ सांस्कृतिक राष्ट्रवादात आहे. नरेंद्र मोदींची भूमिका सांस्कृतिक राष्ट्रवाद मानणारी आहे. सांस्कृतिक राष्ट्रवादाची तलवार ही दुधारी असते. ती आत्मविश्वास आणि न्यूनगंड एकाच वेळी जागे करते, कारण सांस्कृतिक राष्ट्रवाद आपल्या आत्मविश्वासाची मुळे शेकडोच नव्हे, तर हजारो वर्षांपूर्वीच्या आपल्या 'पूर्वजांच्या' कर्तृत्वात शोधतो.

आज जगातील बहुतांश ज्ञाननिर्मिती ज्या देशात होते, त्या देशाशी आपली तुलना याबाबत आपण करायला हवी. जगाच्या कानाकोपऱ्यातून प्रतिभावान लोक या देशात – अमेरिकेत – जातात, तेथील नागरिक होतात. अमेरिकनांच्या काही गटांना

सांस्कृतिक राष्ट्रवादाची गरज असूही शकेल, पण एकूण अमेरिकी समाजाला आत्मविश्वास जागवण्यासाठी सांस्कृतिक राष्ट्रवादाची गरज लागत नाही, कारण त्यांचा वर्तमानच इतका नवोन्मेषशाली असतो, की त्याला भूतकाळात बघायची गरज नसते.. पण हे एकच कारण नाही. मुळात अमेरिका हे राष्ट्र जगातील विविध भागांतून आलेल्या लोकांनी वसलेले असल्यामुळे त्यांचा राष्ट्रवाद हा 'सांस्कृतिक राष्ट्रवाद' असूच शकत नाही. ज्याला अमेरिकन संस्कृती म्हणता येईल ती सतत बदलणारी संस्कृती आहे आणि व्हाइट हाऊसमध्ये साजरी होणारी दिवाळी हे त्याचे उदाहरण ताजेच आहे. मुद्दा हा की, 'आपण मुळात कोण?' हा प्रश्न अमेरिकेच्या बाबतीत गैरलागू असतो.

सांस्कृतिक राष्ट्रवादी माणसाला मात्र हा प्रश्न सतत छळत असतो. वास्तविक पाहता भारत आणि अमेरिकेत एक लक्षणीय साम्य आहे. अमेरिकेप्रमाणेच हा देशदेखील जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या अनेक वंश आणि धर्माच्या लोकांनी बनलेला आहे. आपण बऱ्याचदा असे म्हणतो की, जागतिकीकरण भारताला नवीन नाही; पण आज तंत्रज्ञानामुळे वेगवान झालेल्या जागतिकीकरणाच्या काळातदेखील आपण सांस्कृतिक राष्ट्रवादी भूमिकेच्या प्रभावातून मुक्त व्हायला तयार नाही आणि म्हणून उथळ अभिनिवेश आणि अनावश्यक न्यूनगंडाच्या पाशातूनही बाहेर पडत नाही. हा न्यूनगंड 'अनावश्यक' अशासाठी की, आज अमेरिकेत होणाऱ्या ज्ञाननिर्मितीमध्ये भारतीयांचे मोठे योगदान असते. ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात जगभर अनेक भारतीय आहेत.

आज जगात होणाऱ्या संशोधनावर (उदाहरणार्थ, हिग्ज बोसॉन ऊर्फ 'देवकणा'चा शोध) कोणा एका राष्ट्राची छाप नसते. आपल्यापुढील खरा प्रश्न असा आहे की, भारतीय लोक अमेरिकेत वा अन्यत्र जे कर्तृत्व दाखवतात ते येथे भारतात का नाही दाखवत? हा प्रश्न भारतातील संस्थांच्या उभारणीशी निगडित आहे. संशोधनाला आवश्यक असे प्रोत्साहन व्यक्तीला देण्यात आपल्या संस्था अयशस्वी का ठरतात? या प्रश्नाला भिडण्याची गरज आहे आणि असे करण्यासाठीदेखील सांस्कृतिक राष्ट्रवादाने आजवर दाखविलेले अभिनिवेश हा एक मोठा अडथळा ठरेल, कारण त्यामध्ये व्यक्तीच्या स्वायत्ततेच्या मूल्याचा संकोच करणाऱ्या आपल्या संस्कृतीचे परखड विश्लेषण आवश्यक ठरेल. ते आपण सततपणे केले पाहिजे; पण न्यूनगंडाला शरण जाऊन पुराणांवर प्लास्टिक सर्जरी करण्याची मात्र अजिबात गरज नाही.

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

milind.murugkar@gmail.com

●●●

भारतातलं राजकारण पाकिस्तानच्या दिशेनं?

– निळू दामले

धर्म समाज

गणपती गेले. आता देव्या येतील.

गणपती आले होते तेव्हा प्रत्येक गणपती मंडळाच्या बाहेर राजकीय पक्षांचे फलक होते. गणेश भक्तांचं स्वागत करणारे. बहुतेक फलकांवर त्या त्या पक्षाच्या गल्लीनिहाय पुढाऱ्यांचे फोटो होते. गणपतीचं विसर्जन झालं तेव्हां गणपतींना निरोप देणारे फलक लागले.

नवरात्रात असे किती फलक लागतात ते पहावं लागेल. कारण नवरात्र असेल तेव्हा महाराष्ट्रात निवडणुका असल्यानं आचार संहिता असेल. फलकांवर झालेला खर्च उमेदवाराच्या खर्चात सामिल होईल.

गणपती उत्सव सुरू झाला तोच मुळी राजकीय कारणांसाठी. टिळकाना जनजागृती करायची होती. स्वातंत्र्यासाठी. टिळकांच्या काळात उत्सवाचा खर्च कमी असे. कारण भाषणं, कीर्तनं इत्यादी प्रबोधनाच्या कार्यक्रांवर भर होता. मूर्ती लहान, सजावट अगदीच सामान्य. त्यामुळं खर्चही अगदीच कमी.

अलीकडं मूर्तीही कायच्या काय मोठ्या झाल्या. त्या सार्वजनिक जागेत बसवाव्या लागल्या. मग मंडप आले. मग सजावट आली. हे सारं करण्यासाठी मोठमोठी मंडळं. मग त्यांचे खर्च आले. असं करत करत गणेशोत्सव खर्चिक झाला. आता हा खर्च कुठून भरून काढायचा? सुरवातीला स्थानिक दुकानदार, त्या दुकानात विकल्या जाणाऱ्या वस्तू आणि त्या वस्तुंचं उत्पादन करणाऱ्या कंपन्या यांच्या जाहिराती येऊ लागल्या. या जाहिराती आणि सजावट येवढी असे की त्या पुढे गणपती आणि एकूण उत्सव थिटा पडू लागला.

केव्हां तरी या गणपती उत्सवाचा ताबा राजकीय पक्षांनी घेतला. नेमकी तारीख काही सांगता येणार नाही. गणपती उत्सव आणि दही हंडी. दोन्हींना स्थानिक पुढारी स्पॉन्सर झाले. दोन्ही इव्हेंटचं बजेट वाढू लागलं, काही लाख आणि कोटीच्या घरात जाऊ लागलं.

बंगालमधे दुर्गापूजा असते. म्हणजे नवरात्रच. पक्षांनी तो उत्सव ताब्यात घेतला. देव न मानणाऱ्या मार्क्सवाद्यांनीही देवीला स्पॉन्सर केलं. दुर्गापूजा मंडळांची बजेट काही कोटीच्या घरात गेली. मुंबईत जसा लालबागचा राजा असतो तसं कलकत्त्यात भवानीपूर मंडळ इत्यादी असतात. ही मंडळं म्हणजे धार्मिक क्लब असल्यासारखीच असतात. करोडोंचा व्यवहार. या व्यवहारात सारदा चिटफंड सारखे फ्रॉड घुसल्याचं लक्षात आल्यावर आता या मंडळांच्या कारभाराची चौकशी तपासखात्यांनी आरंभलीय. चोरीचा पैसा मंडळातल्या पुढारी आणि कार्यकर्त्यांकडं सरकवायचा. पैसा आला की इमान आलंच. ज्या राजकीय पक्षाच्या मेहेरबानीनं पैसा येतो त्या पक्षाला मतं मिळवून देणं अशी परतफेड. बदल्यात फ्रॉड करणाऱ्यांना अभय. चौकशी आणि अटकांच्या फेऱ्यांत तृणमूल काँग्रेस, काँग्रेस, भाजप, मार्क्सवादी अशी सर्वच मंडळी सापडलीत.

महाराष्ट्रात राजकीय पक्ष गणपती, नवरात्र, दहीकाला यात गुंतलेले आहेतच. अगदी उघडपणे. फक्त यात फ्रॉड किती आहेत ते माहित नाही. आमदार मंडळी या कार्यकर्त्यांचा वापर आपल्या निवडून येण्यासाठी करत आहेत हे खरं.

एक निरीक्षण असं. ज्या समाजात धर्मनिष्ठा प्रभावी असतात त्या समाजात राजकीय पक्ष धर्माला–धार्मिक प्रतिमांना–उत्सवांना वेठीस धरतात, त्या वाटेनं लोकांना प्रभावित करतात.

आज पाकिस्तानात तसं घडतंय. खरं म्हणजे पाकिस्तान निर्मितीपासूनच तसं घडत आलंय. जिना या धर्म न मानणाऱ्या माणसानं इस्लाम धोक्यात आहे अशी हाकाटी करून भारतातले मुसलमान गोळा केले आणि पाकिस्तान घडवलं. पाकिस्तान निर्माण झाल्यापासून जिना, पाकिस्तान पीपल्स पार्टी आणि नवाज शरीफ यांची मुस्लीम लीग या पक्षांनीही धर्मनिरपेक्ष–सेक्युलर कार्यक्रम अमलात आणत असतानाच धार्मिक भावनांनाच साद घातली. पीपल्स पार्टीच्या तर घटनेतच समाजवाद आणि समता या दोन गोष्टी होत्या, इस्लामशी मेळ न खाणाऱ्या. तरीही झुल्फीकार आणि बेनझीर दोघंही वेळोवेळी इस्लामचा नारा देत लोकांकडं पोचले. नवाज शरीफ यांचा भर आर्थिक सुधारणांवर आहे. उद्योग, व्यापार विकसित व्हावे यासाठी त्यांची खटपट आहे. तेही इस्लामचाच उच्चार करतात, जमाते इस्लामी आणि तहरीके तालीबान या टोकगामी इस्लामी पक्षाशी संधान ठेवून, त्याच्याशी आघाडी करून, त्यांची परवानगी आणि पैसे घेऊन निवडणुक लढवतात.

पाकिस्तानी समाजाच्या घडणीत या वास्तवाचं रहस्य दडलेलं आहे. पाकिस्तानात शिक्षणाचं प्रमाण खूपच कमी आहे. चाळीसेक टक्के अशिक्षितता आहे. स्त्रियांनी शिकावं असा वातावरण पाकिस्तानात नाही. त्यामुळंच मुलींनी शिकावं असा आग्रह धरणाऱ्या मलाला यामुलीच्या तोंडावर असिड फेकलं जातं, तिचा खून करण्याचा प्रयत्न होतो.

दुसरं म्हणजे जी माणसं शिकलेली आहेत त्यांचं मन, त्यांच्या सवयी, त्यांचे विचार, त्यांचे व्यवहार धर्मनिरपेक्ष नाहीत. आर्थिक विकास, विज्ञान, तंत्रज्ञान, बाजार, व्यवस्थापन इत्यादी गोष्टींकडं त्याना मोकळेपणानं पहाता येत नाही. जो काही धर्म त्यांच्या डोक्यात आहे तोच त्यांच्या एकूण व्यवहारात जास्त प्रभावी ठरत असतो. माणसानं धार्मिक असावं परंतु एकूण व्यवहारात धर्माच्या नावाखाली जे सांगितलं जातं ते मर्यादित ठेवावं, होता होईतो धर्म हा व्यक्तिगत आणि खाजगी व्यवहाराचा भाग असावा हे त्यांना पटत नाही. सार्वजनिक व्यवहारातही धर्मानं सांगितलेल काही तत्व जरूर येतात. पण सार्वजनिक व्यवहारात इतरही धर्मनिरपेक्ष तत्वं प्रभावी असतात हे त्याना पटत नाही. शिकलेल्या लोकांनाही.

म्हणूनच धार्मिकतेला आव्हान करण्याकडं पाक राजकीय पक्षांचा कल असतो. राजकीय पक्ष जेव्हां आर्थिक गोष्टीत असमर्थ ठरतात, भ्रष्ट होतात तेव्हां सत्तेत जाण्यासाठी धार्मिक भावनावर भर देऊ लागतात. त्यातूनच अती धार्मिकता आणि नंतर दहशतवाद फोफावतो असा पाकिस्तानचा अनुभव आहे. नेमकं तेच अफगाणिस्तानातही झालं आहे. आणि तेच सीरिया, इराक इत्यादी देशात होतंय.

भारतात गणपती, नवरात्र, दहीहंडी, इत्यादी उत्सवात राजकीय पक्ष पडतात याचा अर्थ काय घ्यायचा? पाकिस्तानमधल्या वेगानं नसेल पण त्याच चाकोरीत भारत चालला आहे असं समजायचं काय?

http://niludamle.blogspot.in/2014/09/blog-post_21.html

●●●

नमस्कार,

'आजचा सुधारक' च्या संकेत स्थळावर आपले मनःपूर्वक स्वागत.
गूगल सर्च वर www.aajachasudharak.in कॉपी पेस्ट केल्यास संस्थळ उपलब्ध होईल.

हे संस्थळ लेखक व वाचकांच्यासाठी पुरोगामी विवेकवादी विचारांना उत्तेजन देणाऱ्या व्यासपीठाच्या स्वरूपात असेल. या विचारांचे लेख, चर्चा, प्रतिसाद यांचा समावेश यात असून त्यांचे येथे स्वागत होईल. **मुख्यपाना**बरोबर **मनोगत, लेखकसूची**, **विषयसूची**, **विशेषांक, ग्रंथसूची, मागील अंक** इत्यादी सदर या संस्थळावर आहेत.

छापिल मासिकाप्रमाणे दर महिन्याला नवीन लेखांची भर **नवीन लेख** या सदराखाली येत राहतील. लेखावरील प्रतिसादांचे स्वागत होईल. कृपया संपर्कात उल्लेख केलेल्या ई– पत्त्यावर आपल्या सूचना, प्रतिसाद पाठवावे व संस्थळाच्या उद्दिष्टाशी पूरक असे लेख पाठवावीत, ही विनंती.